Library

SCHOOL OF POLITICAL EC...

८/६/०८

किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा

'अर्थ'बोध करून देणारे मासिक

३ ● नवकल्पना

५ ● सागरातील संवाद

९ ● 'बुद्धिवादी' चीन

१९ ● आव्हान 'कुटुंबां'ना जपण्याचे !

२३ ● गुंता लोकसंख्येच्या बदलत्या धाटणीचा

२९ ● अर्थबोधपत्रिका पुरवणी

(कर्जमाफी की ग्रामीण पतसंस्थांची मृत्युघंटा ?)

खंड ७ : अंक ३ जून २००८

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**<u>वार्षिक वर्गणी १००/- रुपये</u>**
**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**
वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**<u>'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.</u>**

**<u>वर्गणीसाठी पत्ता</u> :**
**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेल: ispe@vsnl.net, ispe@vsnl.com

---

**अर्थबोधपत्रिका**
**खंड ७ (अंक ३) जून २००८**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**

### *'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?*

- **उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक**
- **अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक**
- **नि:पक्ष व साधार**
- **सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक**
- **हाताशी असणाऱ्या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी**

### *'अर्थबोधपत्रिके'चा हेतू*

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

### *'अर्थबोधपत्रिका'कशी साकारते?*

- **मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन**
- **निवडक साहित्याचे संकलन**
- **संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड**
- **संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.**

---

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**


# नवकल्पना

योग्य वेळी सुचलेल्या एखाद्या कल्पनेत असणारी शक्ती ही सर्वांत प्रभावी ठरते, असे कुणा कल्पक व्यक्तीने म्हणून ठेवले आहे. शिक्षणापासून ते विज्ञान-तंत्रज्ञानापर्यंत, उद्योगांपासून ते अर्थकारणापर्यंत आणि राजकारणापासून ते समाजकारणापर्यंत सर्व विषयांसाठी सार्वकालिक सत्य ठरणारे हे विधान अलीकडे अधिकच महत्त्वाचे बनले आहे. कारण, कोणतेही बदल हे नवनव्या कल्पनेतूनच साकारतात. विशेषतः, 'इनोव्हेशन' हा परवलीचा शब्द बनलेल्या आजच्या ज्ञान-विज्ञानाच्या या युगात अशा कल्पनांचे अवकाश विस्तारतच आहे. सतत चिंतनशील असणाऱ्या विचारी मनात नवकल्पना आकारतात, केवळ आकारतच नाहीत तर त्यांचे उपयोजन कसे होईल याचाही विचार विचारवंत करीत असतात. असे विचारवंत जगाला, आपल्या देशाला, विविध समाजगटांना प्रगतिपथावर जाण्यासाठी नवी दिशा सुचवित असतात. अशा दिशांकडे जाणारी पायवाट मळलेली नसते. पण नवदिशेकडे जाणारे पहिले पाऊल टाकणे हे गरजेचे असते. चीनमधील विचारवंत अशी पावले टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत. यात त्यांना किती यश मिळेल हे सांगणे अवघड आहे. पण साम्यवादाच्या चौकटीत अडकलेल्या देशात काही नवीन प्रयोग होत आहेत ही आशादायी घटना आहे. नवकल्पना, नवीन दिशा व नवीन प्रयोग यांची गरज केवळ राजकीय क्षेत्राला आहे, असे नाही. विज्ञान-तंत्रज्ञान, उद्योग, शिक्षण, शेती आणि इतरही काही क्षेत्रांत असे घडते आहे. नवकल्पनांमधूनच विज्ञानाची प्रगती झाली आहे. मानवी जीवन सुखकर (आणि कधी दुःखकर) बनविण्यात विज्ञानाचा सिंहाचा वाटा आहे. कधी अफाट कल्पनाशक्तीने विज्ञानातील काही शोध लागतात तर कधी निसर्गातील अफलातून बाबींमध्येही विज्ञान दडलेले असते, याचा शोध लागतो. अशा नैसर्गिक बाबींमधील विज्ञानाचा उपयोगही मानव आपल्यासाठी करून घेत असतो. ज्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या मदतीने मानवाने सागराचा तळ गाठला त्या तळाशी असलेला एखादा जलचरही या अभ्यासासाठी प्रेरणा देत असतो. अशी प्रेरणा देणारा निसर्ग

*(पान २६ वर पाहावे)*

# आदरांजली

दिवंगत ज्येष्ठ साहित्यिक आणि नाटककार विजय तेंडुलकर यांचा 'अर्थबोधपत्रिके'च्या उपक्रमाशी प्रारंभापासूनच अनुबंध होता. तारीख २५ जानेवारी २००२ रोजी अर्थबोधपत्रिकेचे तत्कालीन संपादक प्रा. रमेश पानसे यांना त्यांनी पाठविलेले आणि वाचकांच्या प्रतिसादात पूर्वी प्रसिद्ध झालेले त्यांचे पत्र त्यांच्याच हस्ताक्षरात इथे पुनर्मुद्रित करीत आहोत. वाचकांची वाचनसुविधा डोळ्यासमोर ठेवून *(पान २६ वर पाहावे)*



# सागरातील संवाद

निळ्या आकाशाला गवसणी घालण्याचे स्वप्न पाहिलेल्या व ते प्रत्यक्षात आणलेल्या मानवाला निळ्याशार समुद्राच्या पाण्यातील जीवसृष्टीनेही आकर्षित केले आहे. अवकाशातून न्याहाळताना पृथ्वी निळसर दिसते ती समुद्रांमुळेच. व्हेल, शार्क अशा महाकाय माशांपासून ते अतिसूक्ष्म जीवांना आश्रय देणाऱ्या सागरांच्या तळाचा शोध ही संशोधकांसाठी आव्हानाची आणि कुतुहलाची बाब ठरली आहे. नानाविध आकाराच्या, मनमोहक रंगांच्या प्राण्यांच्या हजारो-लाखो जाती-प्रजातींना आणि तरतऱ्हेच्या पाणवनस्पतींना आपल्या उदरात सामावून घेणाऱ्या सागरात प्राण्यांचे, वनस्पतींचे एक निसर्गचक्र आहे. हे निसर्गचक्र सतत चालू राहावे यासाठी निसर्गाने प्रत्येक घटकाला एक वैशिष्ट्य बहाल केले आहे. अशा काही वैशिष्ट्यांमुळे प्रतिकूल परिस्थितीतही त्या घटकाला आपले अस्तित्व टिकविता येते. त्यामुळे निसर्गचक्रात खंड पडत नाही आणि समुद्रातील जैवविविधताही कायम राहते.

आपल्या वैशिष्ट्यांमुळे संशोधकांचे लक्ष वेधून घेणारी समुद्रातील एक प्रजाती आहे Cuttlefish. अफाट सागरात आपले अस्तित्व कायम ठेवणाऱ्या हा जलचर संकटाची चाहूल लागताच क्षणात आपला रंग बदलून सभोवतालच्या सागरी वातावरणात स्वतःला अशा प्रकारे लपवून टाकतो की हा प्राणी इथे होता का, असा प्रश्नच पडावा. या नैसर्गिक वैशिष्ट्याला Camouflage असे म्हणतात. आपल्या बागेतील सरड्यालाही असे रंग बदलता येतात. 'समुद्रातील सरडा' असे म्हटले जाणाऱ्या या Cuttlefishचे हे वैशिष्ट्य केवळ जलचरांमध्येच नव्हे तर सर्व प्राण्यांमध्ये सर्वांत प्रभावी असल्याचे आढळते. गंमत म्हणजे संकट टळताच अगदी दोन-तीन सेकंदांतच Cuttlefish आपले मूळ रूप पुन्हा धारण करतो. या Cuttlefishला केवळ रंगच नव्हे तर आपल्या त्वचेचा पोतही (texture) बदलता येतो. शिवाय अलीकडच्या संशोधनांमधून असेही आढळले आहे की हे प्राणी परस्परांशी चक्क संवादही साधतात. आजच्या 'मोबाइल' युगातील उपमा द्यायची झाली हा तर हा संवाद म्हणजे एकप्रकारे त्यांचा SMS असतो, असे म्हणता येईल. मजा म्हणजे हा संवाद तसा गुप्तपणे घडून येत असतो आणि काही मोजक्या प्रजाती वगळता इतर जलचरांना त्याचा थांगपत्ताही लागत नाही.

या प्राण्याचे नाव Cuttlefish असले तरी हा प्राणी 'मासे' या गटात न मोडता mollusc या गटात मोडतो. ऑक्टोपस गटाशी जवळीक साधणाऱ्या या प्राण्याला आठ हात आणि दोन tentacles असतात. त्याचे डोळे W आकाराशी साधर्म्य साधणारे व मोठे असतात. Mollusc गटातील अन्य जलचरांपेक्षा Cuttlefishला अनेक क्षमता प्राप्त झाल्या आहेत. सस्तन (mammals) प्राण्यांमध्येही त्या क्षमता क्वचित आढळतात. त्यामुळे जीवशास्त्राच्या दृष्टीने त्याचा अभ्यास फार महत्त्वाचा ठरला आहे. इतर छोटे जलचर हे त्याचे भक्ष्य असते, तसेच तोही इतरांचे भक्ष्य असतो. पण त्याला खाण्यासाठी त्याच्या दिशेने झेपावणाऱ्या प्राण्यांना Cuttlefish जो प्रतिसाद देतो ते त्याचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. ऑक्टोपसवर हल्ला होतो तेव्हा ऑक्टोपस स्वतःला अक्राळविक्राळ बनवतो. मात्र, ऑक्टोपसशी जवळीक साधणारा हा प्राणी स्वतःला परिस्थितीनुसार अधिक आकर्षक बनवून लपून बसतो.

Cuttlefishमध्ये Cuttlebone असते. ते कॅल्शियम कार्बोनेटचे बनलेले असते. ते जाळीदार असून त्यामुळे Cuttlefish ला हलकेपणा/तरंगण्याची शक्ती (Buoyancy) मिळते. रंग बदलण्यासाठी Cuttlefishला साहाय्यभूत ठरणारा घटक आहे chromatophores. यातील लाल, पिवळ्या, तपकिरी आणि काळ्या घटकांमुळे/द्रव्यांमुळे सभोवतालच्या परिस्थितीनुसार रंग बदलणे Cuttlefishला शक्य होते. Cuttlefishच्या त्वचेतील पेशीत हे घटक असतात. शरीरभर पसरलेल्या अनेकानेक पेशी रंग बदलण्याच्या प्रक्रियेत कार्यरत होत असतात. त्याचबरोबर त्या पेशींच्या सभोवताली असलेले स्नायूही कार्यरत होतात. या स्नायूंच्या हालचालींवर मेंदूचे नियंत्रण असते. स्नायूंच्या हालचालींमुळेच हे रंग दिसू शकतात. स्नायूंची हालचाल होते तेव्हा हे विविधरंगी घटक विविधरंगी प्रकाशकिरणे परावर्तित करतात. प्रकाशकिरणे परावर्तित करण्याची ही क्रिया काही सेकंदांतच घडून येत असते. रंग बदलण्याची ही प्रक्रिया केवळ संकटातून वाचविण्यासाठीच होत असते असे नाही, तर याद्वारे काही गुप्त संदेशही पसरत असतो. या जलचरांचा हा जणू भाषेविण संवादच असतो. असा संवाद साधण्याच्या या जलचरांच्या काही ठरावीक पद्धती असतात. Cuttlefishचा अभ्यास करणारे संशोधक Roger Hanlon यांच्या म्हणण्यानुसार संदेश पाठविण्याच्या अशा किमान ४० पद्धती आढळतात. हे संदेश इतर Cuttlefishपर्यंत त्याचप्रमाणे अन्य काही प्रजातींपर्यंत पोहचतात. असे संदेश पाठविणारा Mollusc या गटातील हा एकमेव जलचर असावा, असा अभ्यासकांचा कयास आहे.

ब्रिटनमधील Keri Langridge या संशोधिकेने Cuttlefishवर एक प्रयोग केला. तिने एका टाकीमध्ये Cuttlefishला ठेवले आणि त्याला भक्ष्य करणाऱ्या दुसऱ्या जलचराला शेजारच्या टाकीमध्ये ठेवले. काही आरशांच्या मदतीने तिने असे चित्र उभे केले की हा दुसरा जलचर आपल्याच टाकीमध्ये आहे असा भास Cuttlefishला होऊन तो आपल्याला खाण्यासाठीच येतोय असे त्याला वाटावे. या दुसऱ्या जलचराला बघितल्याबरोबर Cuttlefishने आपल्या शरीराचा आकार बदलला आणि आपण आकाराने अधिक मोठे आहोत असे भासविण्याचा प्रयत्न केला. अनेक प्राणी असा भास निर्माण करतात. पण दरवेळी ही क्लृप्ती यशस्वी होतेच असे नाही आणि ती केव्हा यशस्वी होणार नाही हेदेखील प्राण्यांना माहिती असते. त्यामुळे दुसरे मार्ग अवलंबिले जातात किंवा तो प्राणी सरळ पळ काढतो. Cuttlefishवर देखील अशी पळ काढण्याची वेळ कधीकधी येते. सस्तन प्राणी आणि Cuttlefishयांच्यातील आकलनशक्तीत मोठी दरी असावी, असे साधारणतः मानले जाते. पण आपल्या अस्तित्वाला उपद्रव निर्माण करणाऱ्या प्रजाती कोणत्या, या बाबतीत Cuttlefishचे आकलन लाखो वर्षांपासून घडले असावे, असे दिसते. डॉगफिश आणि खेकडे यांच्यापासून Cuttlefishला मोठा धोका असून त्यांच्यासमोर तो पलायनाचा मार्ग स्वीकारतो, असे त्या म्हणतात.

## लष्करालाही शिकण्यासारखे

सभोवतालच्या परिस्थितीत स्वतःला लपविण्याचे Cuttlefishचे वैशिष्ट्य इतके उल्लेखनीय आहे की लष्करालाही त्यात रस निर्माण झाला आहे. ब्रिटनमधील संरक्षणविभागाशी संबंधित असलेल्या संशोधकांनी 'जर्नल ऑफ डिफेन्स सायन्स'मध्ये या विषयी संशोधनपर लेख लिहिला आहे. Cuttlefishला सभोवतालच्या दृष्य परिस्थितीचे आकलन होणे ही एक बाब झाली, पण त्या परिस्थितीत क्षणार्धात रंग बदलण्याची त्याची क्षमता अभ्यसनीय आहे. त्वचेचा रंगबदल घडवून आणणाऱ्या अवयवांवर व त्या संपूर्ण कार्यपद्धतीवर Cuttlefishचे असणारे नियंत्रण हे फार महत्त्वाचे आहे. एवढेच नव्हे तर आपल्यावर हल्ला करायला येत असलेल्या प्राण्याचे लक्ष विचलित करण्याची क्षमताही Cuttlefishकडे आहे. Cuttlefish आपली त्वचा ढगांसारखी बनवतो व तो स्वतः त्या वेळी सतत हालत असतो, म्हणून जणू ढगच हालत आहेत असा भास निर्माण होतो. या हालचालींमुळे शत्रू गोंधळतो. याला Kinetic patterning असे म्हटले जाते. ही बाब लष्करासाठी उपयुक्त ठरू शकते, असे निरीक्षण या संशोधकांनी नोंदले आहे.

Roger Hanlon यांच्या संशोधनांतून असे दिसून येते की Cuttlefish प्रकाशाच्या माध्यमातून संदेश पाठवितात. सूर्यप्रकाश जेव्हा पाण्यात प्रवेशतो तेव्हा प्रकाशकिरणे एकाच दिशेकडे परावर्तित (polarised) होतात, तसेच तेथे विद्युत व चुंबकीय क्षेत्र निर्माण होते. प्रकाशकिरणांशी संबंधित या घडामोडी Cuttlefishला दिसतात आणि हे जलचर Camouflage करून लपले असताना आपल्या शरीरातील प्रकाशकिरणे परावर्तित करणाऱ्या घटकांद्वारे या polarisationच्या प्रक्रियेत सहभागी होऊन संदेशांची देवाणघेवाण करतात. आपल्यावर संकट कोसळणार आहे हे लक्षात येताच इतरांना त्या संकटाची जाणीव करून देणे हेही गरजेचे असते. पण असे करताना त्या विशिष्ट जलचराच्या हालचालींमुळे तो स्वतःच प्रथम अडचणीत येण्याची शक्यता असते. म्हणून आपला बचाव करीत असतानाच इतरांना संदेश देणे हे या वेळी महत्त्वाचे ठरते. polarisationच्या प्रक्रियेत सहभागी होऊन संदेश पाठविताना Cuttlefish नेमके हेच करीत असावेत, असे संशोधकांचे अनुमान आहे.

आणखी एक लक्षात घेण्यासारखा मुद्दा असा की Cuttlefishची विशिष्ट अशी स्थिती (Posture) वा हालचाल यांनुसार ते इतर Cuttlefishना पाठवीत असलेल्या संदेशांची स्पष्टता होणे अवलंबून असते असे नाही. एक प्रकारे हे गुप्त संदेश असतात, असे दिसते. कधीकधी आपल्या त्वचेचे पोत बदलून वा त्यावरील 'डिझाइन' बदलूनही Cuttlefish संदेश पाठवतात. म्हणजे जेव्हा त्यांची त्वचा झेब्र्यासारखी दिसते तेव्हा इतर Cuttlefish बरोबर आपण लढण्यास तयार आहोत, असे त्यांना सुचवायचे असते. जेव्हा त्यांची त्वचा वाऱ्याबरोबर वाहणाऱ्या ढगांसारखी दिसते तेव्हा त्यातून दोन संदेश जात असतात. Cuttlefishचे जे भक्ष्य आहे त्याने या ढगांकडे पाहात राहावे व त्या वेळात Cuttlefishकडून त्याची शिकार केली जाईल, असा याचा एक अर्थ होतो. तर, Cuttlefish जेव्हा इतरांचे भक्ष्य बनण्याची शक्यता असते तेव्हा या ढगांकडे पाहून त्या दुसऱ्या जलचराने गोंधळून जावे व येथे Cuttlefish नाही, असे त्याला वाटावे असा दुसराही संदेश पोहचविण्याचा प्रयत्न असतो. पण संदेश पाठविण्याच्या या क्षमतेचा उपयोग कसकसा होत असावा व त्याला प्रतिसाद कसा मिळत असावा, यासंबंधी अधिक नेमके संशोधन होण्याची गरज असल्याचे मत Roger Hanlon मांडतात. हे संशोधन जसजसे पुढे जाईल तसतशा आणखी काही बाबी स्पष्ट होतील. एकंदरीत असे दिसते की सागरातील या गुप्त संवादाने संशोधकांच्या विचारांना चांगलेच खाद्य पुरविले आहे. ✿✿

# 'बुद्धिवादी' चीन

आपल्या आर्थिक प्रगतीच्या वेगाने जगाला अचंबित करणाऱ्या चीनचे आकर्षण अनेकानेक अभ्यासकांना वाटते. या आकर्षणापोटी चीनच्या प्रगतीच्या अनेक बाजू अनेक अभ्यासांमधून मांडण्यात आलेल्या दिसतात. पण या प्रगतीची एक बाजू मात्र बहुतांश अभ्यासांमधून फारशी पुढे आलेली दिसत नाही. ती म्हणजे चीनमधील धोरणांमध्ये बुद्धिवादीवर्गाचा वाढता प्रभाव ही होय. हा प्रभाव विविध विषयांच्या संदर्भात आढळतो. अर्थकारण, राजकारण, समाजशास्त्र, विज्ञान-तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांत चिनी बुद्धिवादीवर्ग सक्रिय बनला आहे. सर्व क्षेत्रांतील जागतिकीकरणाचा संदर्भ लक्षात घेऊन चीनची भावी वाटचाल कशी असावी हा त्यांच्यासाठी चर्चेचा विषय असतोच. शिवाय, पाश्चात्यांचे अंधानुकरण न करता (आणि साम्यवादी पक्ष अडचणीत न येता ?) चीनमध्ये राजकीय सुधारणा कशा घडून याव्यात यावरही अनेक अभ्यासक खल करीत असतात. या अभ्यासकांमध्ये साम्यवादी पक्षाचे नेते, पक्षाला अनुकूल असणारे अभ्यासक यांचा समावेश तर आहेच, शिवाय पक्षाबाहेर असणारे अनेक अभ्यासकही त्यात सहभागी झालेले आहेत. या अभ्यासांमधून अनेक नवनवीन कल्पना मांडण्यात येत आहेत आणि व्यवहारात त्यांचा अवलंब करता येईल किंवा कसे हेही तपासले जात आहे.

या संदर्भात बीजिंगस्थित 'चायनीज् अकॅडमी ऑफ सोशल सायन्सेस'चे (CASS) उदाहरण बोलके आहे. या संस्थेतील ५० संशोधनकेंद्रांमध्ये २५०पेक्षा अधिक विद्याशाखांमध्ये विविध विषयांबाबत संशोधन चालू आहे. यात सुमारे चार हजार संशोधकांचा सहभाग आहे. असे हजारो अभ्यासक व तशा डझनभर संस्था चीनमध्ये आहेत. चीनमधील संशोधकांची ही संख्या लक्षणीय ठरते. कारण, विचारवंतांसाठी स्वर्ग असे मानले गेलेल्या अमेरिकेत फार फार तर १० हजार विचारवंत असावेत, युरोपीय देशांमध्ये अमेरिकेच्या तुलनेत कमी आणि ब्रिटनमध्ये तर त्यांची संख्या हजारपेक्षाही कमी असावी, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. चिनी अभ्यासकांच्या चर्चा संशोधनपर नियतकालिकांमधून, साम्यवादी पक्षाच्या व्यासपीठावरून आणि इंटरनेटच्या माध्यमातूनही घडून येत आहेत. या चर्चांमुळे तेथे विचारवंतांचे गटही पडत आहेत.

'नवे-डावे' (न्यू लेफ्ट) या गटातील व्यक्तींच्या विषमतेबाबतच्या चर्चा 'नव्या-उजव्यां'बरोबर (न्यू राइट) रंगतात. राज्यशास्त्राचे अभ्यासक निवडणुका, कायद्याचे राज्य आणि परराष्ट्रीय धोरण या मुद्द्यांचा ऊहापोह करतात. तर पुराणमतवाद्यांमधील आधुनिक (नीओकॉन्स -Neo-conservativesचे लघुरूप ?) चीनच्या एकूणच भवितव्याबाबत व धोरणांबाबत उदारमतवाद्यांशी वाद घालतात. जागतिकीकरणाची प्रक्रिया, तंत्रज्ञानाचा वाढता वेग आणि आऊटसोर्सिंग अशा काही बाबी विचारात घेऊन अमेरिकेतील अभ्यासक टॉमस फ्रीडमन यांनी 'द वर्ल्ड इज फ्लॅट' अशी संकल्पना हेच शीर्षक असलेल्या ग्रंथात मांडली आहे. या संकल्पनेला आव्हान देण्याचा प्रयत्न चीनमधील अभ्यासक करीत आहेत. 'वॉल्ड वर्ल्ड' असे त्याचे नामकरण करण्यात आलेले आहे. मात्र ते नेमके कसे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. चीनची विद्यमान राजकीय व आर्थिक घडी न मोडता जागतिक बाजारपेठेचा अधिकाधिक फायदा चीनला करून घेता यावा यासाठी चीनमधील विचारवंत प्रयत्नशील आहेत. चीनमधील अभ्यासकांचा प्रभाव नजरेत भरतो कारण चीनमधील राजकीय प्रक्रियेत साम्यवादी पक्ष हा एकमेव पक्ष आहे. तेथे विरोधी पक्ष नाही, कामगारांच्या स्वतंत्र कामगार संघटना नाहीत, राजकीय पक्ष आणि प्रसारमाध्यमे यांच्यात वाद नाहीत, त्यामुळे बुद्धिवाद्यांच्या चर्चा या एकप्रकारे साम्यवादाने बंदिस्त असलेल्या तेथील राजकीय प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग बनल्या आहेत. चीनची अर्थव्यवस्था, चीनचे परराष्ट्रधोरण, उत्तर कोरिया वा जपानबरोबरचे चीनचे राजकीय संबंध या विषयांवर तेथील प्रसारमाध्यमांमधून खुल्या चर्चा होत असल्या तरी साम्यवादी पक्षाची सत्ता, तिआनमेनची घटना, तिबेटचा प्रश्न अशा काही विषयांवर तेथे अजिबात चर्चा होत नाहीत, हेही उल्लेखनीय.

इंटरनेटच्या वापरावर सरकारची कडक नजर असली तरी वृत्तपत्रांच्या तुलनेत तेथे मत मांडण्याला बरेच स्वातंत्र्य आहे (अलीकडे मात्र विचारस्वातंत्र्याला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या हू जिया नामक ब्लॉगरला अटक करण्यात आली आहे). अभ्यासकांच्या खाजगी चर्चांमध्ये मात्र राजकीय सुधारणांपासून अनेक विषय उपस्थित होत असतात. धोरणकर्त्यांवर बुद्धिवाद्यांचा प्रभाव पडतो आहे की धोरणकर्तेच आपल्या आवडत्या बुद्धिवाद्यांच्यामार्फत आपले विचार वदवून घेत आहेत, अशी चर्चाही चीनमधील नागरिकांमध्ये होते. ते काहीही असले तरी या चर्चा आता राजकीय प्रक्रियेचा एक भाग बनल्या आहेत. 'पॉलिट ब्युरो'च्या अभ्यास गटांमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी आता बुद्धिवाद्यांना निमंत्रित केले जात आहे.

चीनमधील बुद्धिवादीवर्ग आता विचारांचा खुलेपणा मान्य करून पाश्चात्यांकडे झुकतो आहे का, असा प्रश्नही या वेळी उपस्थित होतो. तसे पाहता चीनने मान्य केलेला साम्यवाद हा मुळात आयात केलेलाच आहे. १९७८नंतर चीनमधील सुमारे दहा लाख विद्यार्थी उच्चशिक्षणासाठी पाश्चात्य देशांमध्ये गेले. त्यांपैकी मायदेशी परतलेले विद्यार्थी साम्यवादी विचारसरणीच्या परंपरागत चौकटीतून बाहेर पडून वेगळी मते मांडू लागल्याचे आढळले. मायदेशी परतणाऱ्या अशा विद्यार्थ्यांची संख्याही तेथे हळूहळू वाढते आहे. अर्थात, बुद्धिवादी मने घडण्याची चीनमधील प्रक्रिया आणि पाश्चात्य देशांमधील प्रक्रिया यांत फरक आहे. चीनमधील शिक्षणपद्धतीत अजूनही साम्यवाद शिकविला जातो, पाठांतराला व पठडीबद्ध शिक्षणाला तेथे महत्त्व देण्यात येते, शिवाय सुशिक्षित तरुणांकडून वैचारिक बंडखोरी होणार नाही यासाठी त्यांच्यावर 'विशेष लक्ष'ही ठेवण्यात येते.

### 'नवे-उजवे' विरुद्ध 'नवे-डावे'

१९८० व ९०च्या दशकात चीनमध्ये आर्थिक सुधारणा घडवून आणण्यात 'नवे-उजवे' (न्यू राइट) आघाडीवर होते. या सुधारणा कशा घडवायच्या याची एक गंमतशीर गोष्ट या गटाचे अभ्यासक Zhang Weiying सांगतात. समजा, एका गावातील नागरिकांचे दैनंदिन व्यवहार घोड्यांच्या श्रमांवर चालू आहेत तर दुसऱ्या गावातील नागरिकांना यासाठी झेब्रा हा प्राणी अधिक उपयुक्त वाटतो. कालांतराने, घोड्यांवर अवलंबून असलेल्या गावातील काही नागरिकांच्या असे लक्षात येते की शेजारच्या गावातील झेब्रा हा प्राणी अधिक उपयुक्त ठरत असून त्यामुळेच त्या गावाची अधिक प्रगती होत आहे. आता आपल्या गावातील घोडे घालवून त्याऐवजी झेब्रे आणायचे कसे ? मग हे नागरिक एक युक्ती लढवतात. इतर नागरिक निद्राधीन झाले की ते गावातील घोड्यांच्या पाठीवर झेब्र्यासारखे पट्टे रंगवतात आणि 'आपण केवळ घोड्यांना अधिक आकर्षक बनवत आहोत', असे दुसऱ्या दिवशी नागरिकांना सांगतात. थोड्याच दिवसांत गावातील सर्व घोड्यांचे असे रंगवलेले झेब्रे बनतात. लोकांनाही हे रंगवलेले घोडे बघण्याची सवय होते. मग काही रंगवलेले घोडे गावाबाहेर घालवून त्यांच्या जागी खरे झेब्रे आणण्यात येतात. असे करत हळूहळू सर्व घोडे जाऊन ते गाव झेब्र्यांचे बनते. मग एके दिवशी, आपले गाव झेब्र्यांवर अवलंबून आहे, असे ऐलान अनुभवी मंडळींकडून करण्यात येते. सुधारणा करताना हीच गोष्ट व्यवहारात आणण्याचा प्रयत्न चीनमध्ये करण्यात आला आहे, असे Zhang Weiying स्पष्ट करतात.

या काल्पनिक गोष्टीला अनुसरून त्या काळात सरकारने dual-track pricing हे धोरण अवलंबिले. या धोरणानुसार, काही वस्तू वा सेवा सरकारने ठरविलेल्या दरानुसार आणि काही वस्तू वा सेवा बाजारपेठेकडून निर्धारित केल्या जाणाऱ्या दरानुसार ग्राहकांसाठी उपलब्ध करून देता येणार होत्या. म्हणजे समाजवादाप्रती सरकारची असलेली निष्ठा व बांधिलकी कायम ठेवता येणार होती. त्यामुळे कालांतराने अनेकानेक वस्तू वा सेवांचा समावेश बाजारपेठेने निर्धारित केलेल्या दराच्या गटात केला जाऊन सर्वच वस्तू त्या दराने विकत घेण्याची सवय ग्राहकांना हळूहळू होते. थोडक्यात, वस्तू वा सेवांच्या किंमती सरकारकडून ठरविण्याची पद्धत मोडीत काढली जाऊन ती निर्णयप्रक्रिया बाजारपेठेकडून घडत जाते. (साम्यवादी) अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हा एक मोठा बदल ठरतो.

घोडे व झेब्रे या गोष्टीनुसार घडलेले एक गाव आहे शेनझेन (Shenzhen). १९७०च्या दशकात केवळ मच्छिमारीवर अवलंबून असणाऱ्या या छोट्या गावाचा कायापालट पुढच्या तीन दशकांत घडून आला तो Zhang Weiying आणि त्यांचे सहकारी यांनी मांडलेल्या चिनी भांडवलशाहीच्या प्रयोगातून. चीनमधील पहिले विशेष आर्थिक क्षेत्र (Special Economic Zone - SEZ - सेझ) १९७९मध्ये येथेच साकारले. विशेष आर्थिक क्षेत्राचा लाभ समाजातील काही विशिष्ट घटकांनाच होऊ शकतो हे ध्यानात घेऊन, 'काहींनी तरी लवकर श्रीमंत व्हावे', असे स्पष्ट मत चीनचे तत्कालीन धोरणकर्ते डेंग झिआओपिंग यांनी मांडले. या धोरणानुसार शेनझेनचा विकास झाला. पण या धोरणाचे लाभ तळागाळापर्यंत झिरपले नाहीत. कामगारांच्या स्थितीत फारशा सुधारणा घडून आल्या नाहीत. समाजघटकांमधील विषमता वाढली. एकाच भागाचा विकास झाला. त्यामुळे धोरणकर्त्यांवर प्रभाव पाडणाऱ्या Zhang Weiying सारख्या अभ्यासकांना आजमितीस टीकेला सामोरे जावे लागत आहे. त्यांच्याविरुद्ध 'नवे-डावे' (न्यू लेफ्ट) हा गट उभा ठाकला आहे.

'नवा-डावा' हा गट 'नव्या-उजव्यां'च्या धोरणांमधील त्रुटींवर बोट ठेवतो. भांडवलशाहीचे सौम्य रूप हा गट पुढे आणतो. या गटातील एक अभ्यासक आहेत Wang Hui. राज्यशास्त्र हा त्यांचा विषय. तिआनमेन चौकातील घटनेसंदर्भात त्यांच्यावर टीका झाली होती. तेव्हा काही काळ त्यांना अज्ञातवासात राहावे लागले होते. त्या वेळी त्यांचा बाजारपेठीय व्यवस्थेवर विश्वास होता. पण गेली काही वर्षे समाजात मिसळून नागरिकांच्या समस्यांचे स्वरूप ते जाणून घेत आहेत.

त्यामुळे बाजारपेठीय अर्थव्यवस्थेमुळे समाजातील सर्व घटकांना न्याय मिळतोच असे नाही, असे त्यांच्या लक्षात आले आहे. १९९०च्या दशकात त्यांनी अमेरिकेत राजकीय आश्रय घेतला होता. त्या काळात त्यांच्या या विचारांना पुष्टीच मिळाली. त्यामुळे समाजातील विषमतेला प्रतिबंध करण्यासाठी शासनाला महत्त्वाची भूमिका बजावावी लागेल, या निष्कर्षाप्रत ते आले आहेत. चीनमधील भ्रष्टाचारावर, खाजगीकरणावर ते जोरदार टीका करतात. पण तरी त्यांचा गट 'नवा-डावा' आहे. तो 'नवा' आहे कारण, बाजारपेठीय सुधारणांना काही प्रमाणात तो मान्यता देतो आणि हा गट 'डावा' आहे कारण, समाजातील विषमता या गटाला अस्वस्थ करते. या गटांच्या मते भरकटलेला समाजवाद आणि भांडवलशाही या दोन्हींमधील वाईट बाबींमुळे चीन सध्या कात्रीत अडकला आहे. बाजारपेठीय सुधारणांच्या मार्गावरून मार्गक्रमण करीत असतानाही चीनचा आर्थिक विकास समतोल असायला हवा, तसेच ठोकळ देशी उत्पादनाला (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट -जीडीपी) प्राधान्य देतानाही कामगारांच्या अधिकारांचे आणि पर्यावरणाचे रक्षण करणे हे महत्त्वाचे आहे, अशी या गटाची भूमिका आहे.

आर्थिक सुधारणांच्या काळात चीनमध्ये वर्धिष्णू झालेल्या श्रीमंतीची पार्श्वभूमीही यामागे आहे. ही श्रीमंती अभिजनांच्या हातीच एकवटू द्यायची की सामान्य नागरिकांच्या अभ्युदयार्थ विविध योजना राबविण्यासाठी तिचा उपयोग करायचा, असा विचार या गटाकडून करण्यात येत आहे. सामाजिक लोकशाहीचा (सोशल डेमॉक्रसी)चिनी प्रयोग करून पाहण्याला हा गट महत्त्व देतो. त्यामुळे संस्थात्मक सुधारणा त्यांना महत्त्वाच्या वाटतात. या गटातील Wang Shaoguang हे राजकीय अर्थतज्ज्ञ असून नागरिकांना स्वस्त आरोग्यसेवा मिळावी, यासाठी ते आग्रही आहेत. Cui Zhiyuan हे राज्यशास्त्राचे अभ्यासक असून, कंपन्यांच्या कामकाजाबाबत कामगारांना मत मांडण्याचा हक्क मिळवा यासाठी कंपनीशी संबंधित मालमत्ताविषयक कायद्यात काही दुरुस्ती करण्याचा मुद्दा ते मांडतात. Hu Angang हे अर्थतज्ज्ञ पर्यावरणाला प्राधान्य देऊन हरित विकासाला प्राधान्य देतात. त्यामुळे चीनमधील सत्ताकेंद्राचा कल किंचित डावीकडेच झुकताना दिसतो. चीनचे धोरणकर्ते हू जिंताओ आणि वेन जिआबाओ यांनी २००५च्या अखेरीस अकरावी पंचवार्षिक योजना आखताना 'हार्मोनिअस सोसायटी'कडे जाण्याचे उद्दिष्ट पुढे ठेवले. चीनमध्ये आर्थिक सुधारणांचा अंमल चालू झाल्यानंतर (१९७८पासून) आर्थिक सुधारणांना प्राधान्य देण्याऐवजी असे वेगळे उद्दिष्ट पंचवार्षिक योजनेत प्रथमच मांडण्यात आले. 'कल्याणकारी शासन' अशी भूमिका यातून पुढे आली.

सेवानिवृत्ती वेतन व बेरोजगार भत्ता आणि आरोग्यविमा यांसाठी असलेल्या निधीत वाढ करण्याबरोबरच ग्रामीण भागांतील नागरिकांवरील कराचा बोजा कमी करणे, ग्रामीण भागांत आरोग्यविषयक इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देणे यांवर या योजनेत भर देण्यात आला आहे. ऊर्जेवरील खर्च २० टक्क्यांनी कमी करण्याचे या योजनेत ठरविण्यात आले आहे. चीनमधील धोरणांची नवी दिशा दर्शविणारी ही एक पथदर्शक योजना असल्याचे मानले जाते. 'नव्या उजव्यां'च्या दृष्टिकोणातून ही एक सातत्यशील सुधारणा प्रक्रिया आहे. शिवाय बाजारपेठीय घडामोडींमुळे आर्थिक विकासाला चालना मिळेल, हेही यात मान्य करण्यात आले आहे. त्यामुळे विविध पातळ्यांवर तसेच नागरिकांनाही या सुधारणांचा धक्का अचानक बसणार नाही. 'नव्या डाव्यां'ना या धोरणांमुळे वाढणारी विषमता आणि पर्यावरणीय समस्या यांबाबत काळजी वाटते. याच प्रक्रियेत संस्थात्मक पातळ्यांवर स्पर्धा आणि सहकार्य यांचा मेळ कसा बसेल, असाही प्रश्न त्यांना पडतो.

### बुद्धिवादी गटाची वाटचाल लोकशाहीकडे ?

खुल्या बाजारपेठेच्या संकल्पनेबरोबरच उदारमतवादी लोकशाहीच्या संकल्पनेचा प्रसार देशोदेशी झाला. पण चिनी नेत्यांच्या मते तसे असलेच पाहिजे असे नाही. म्हणजे, लोकशाहीची संकल्पना खुल्या बाजारपेठीय अर्थव्यवस्थेच्या संकल्पनेपासून चार हात लांब असली तरी चालू शकते. तेथे लक्षात घेण्यासारखे असे की १९८० व १९९०च्या दशकात ज्या चिनी बुद्धिवाद्यांनी लोकशाहीचा मुद्दा उचलून धरला होता त्यांनीच तो आता बाजूला ठेवला आहे. Yu Keping हे चीनचे अध्यक्ष हू जिंताओ यांचे अनौपचारिक सल्लागार आहेत. एक विद्यापीठ, एक 'थिंक टँक' आणि व्यवस्थापन सल्लागारसंस्था अशी तिहेरी भूमिका त्यांची संस्था बजावते. त्यांच्या मते चीनमध्ये एका रात्रीत राजकीय सुधारणा घडून येणे योग्य ठरणार नाही. त्यापेक्षा गावपातळीवर हळूहळू त्याची सुरुवात झाली तर ते उचित ठरेल. सर्वप्रथम साम्यवादी पक्षात लोकशाही रुजली आणि त्यानंतर ती समाजात रुजली तर ते चीनसाठी योग्य ठरावे. प्रथम साम्यवादी पक्षांतर्गत निवडणुका व्हाव्यात, अशी त्यांची अपेक्षा आहे. सिचुआन या गावात नेता निवडीसाठी असा प्रयोग करून पाहण्यात आला आहे. हीच प्रक्रिया पक्षात सर्व पातळ्यांवर घडू शकेल. असे झाल्यास साम्यवादी पक्षात वेगवेगळे गट स्थापन होतील. कालांतराने या गटांमधून ('नवे डावे' व 'नवे उजवे' ) लोकशाहीसाठी आवश्यक असणारे विविध पक्ष स्थापन होऊ शकतात, असा त्यांचा आशावाद आहे.

पण एका गावात असे घडले म्हणून इतरत्रही तसे घडेल असे मानणे चुकीचे ठरेल, असे म्हणणारा गट चीनमध्ये आहे. सिचुआनमध्ये स्थानिक नेत्यांचे ध्येय वेगळे होते. त्यांना स्वतःचे महत्त्व तेथे प्रस्थापित करायचे होते. शिवाय स्थानिक पातळीवर तेथे विविध कारणांनी मोठी निदर्शनेही झाली होती. त्यामुळे तेथील परिस्थिती वेगळी होती. पण इतर गावांत असे घडण्याची शक्यता कमीच आहे, असेही म्हटले जाते.

जेथे लोकशाही प्रस्थापित झाली आहे तेथेही काही समस्या उद्भवत असतात (उदाहरणार्थ - मतदानाची टक्केवारी घटणे, नेत्यांवरील विश्वास कमी होणे, पक्षांची व राजकीय नेत्यांची लोकप्रियता उतरणीला लागणे इत्यादी), असे म्हणून चीनमधील बुद्धिवादी एक वेगळेच 'मॉडेल' पुढे आणतात. निवडणुकांना महत्त्व देण्यापेक्षा नागरिकांची मते जाणून घेणे, तज्ज्ञांचे विचार जाणून घेणे, सर्वेक्षणांतून पुढे आलेले मुद्दे विचारात घेणे याला तेथे महत्त्व देण्यात येत आहे. 'चायनीज् अकॅडमी ऑफ सोशल सायन्सेस'मधील एक अभ्यासक Fang Ning हे या प्रकाराला एक वेगळी उपमा देतात. पाश्चात्य देशांमधील लोकशाहीची तुलना ते साचेबंद मेनू असलेल्या हॉटेलशी करतात. म्हणजे जेथे शेफ (नेता) निवडण्याचा तुम्हाला (नागरिकांना) अधिकार असतो, पण मेनू (धोरणे) निवडण्याचा नसतो. तो शेफ (नेता) जे शिजवेल (जी धोरणे आखेल) तेच तुम्हाला खावे (मान्य करावे) लागते. तसे न करता चीनमध्ये शेफ (साम्यवादी पक्ष व त्या पक्षाचा नेता) एकच असेल पण मेनू (विविध धोरणे) तुम्हाला (नागरिकांना) निवडता येईल,असे पर्यायी प्रारूप ते सुचवितात. उदाहरणार्थ - एका गावी 'रँडम सॅम्पलिंग'द्वारे नागरिकांचा एक गट निवडण्यात आला. धोरणे ठरविण्यासंदर्भात तज्ज्ञांबरोबर चर्चा करताना या गटालाही त्यात सहभागी करून घेण्यात आले. त्यानंतर त्यांना मतदान करण्यास (deliberative polling) सांगण्यात आले. विविध योजनांसाठी असलेला निधी कसा खर्च करायचा हे या मतदानाधारे तसेच तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार ठरविण्यात आले. अर्थात, असे काही नवे प्रयोग आदर्श ठरतील, असा दावा करता येत नसला तरी राजकीय सुधारणांच्या दिशेने टाकलेले हे एक पाऊल महत्त्वाचे ठरावे, असे अभ्यासकांना वाटते. प्रशासनदेखील असे काही प्रयोग करून पाहण्यास उत्सुक आहे. उदाहरणार्थ, प्रशासनाने नागरिकांचा एक विशिष्ट गट (फोकस ग्रुप) स्थापन करून चर्चा घडविण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात, असे प्रयोग करून पाहताना साम्यवादी पक्षाच्या अधिकारांवर गदा येणार नाही, याची काळजी तेथे घेण्यात येतेच.

चीनमध्ये राजकीय सुधारणा होणे अशक्यच आहे, असे म्हटले जाते. पण तसे घडणे आता शक्य आहे असे या सर्व घडामोडींवरून दिसून येत आहे. चीनमधील एकपक्षीय पद्धत कदाचित दीर्घकाळ टिकणार नाही याची जाणीव बहुधा साम्यवादी राजवटीलाही झाली आहे. म्हणूनच किमान नजीकच्या भविष्यात तरी आपले स्थान टिकून राहील याची पुरेपूर काळजी ही राजवट घेत आहे. जागतिकीकरणाच्या या काळात एकपक्षीय सरकारची अधिकारशाही असूनही देशाची आर्थिक प्रगती करता येते, हे चीनने दर्शविले आहे. सरकारच्या निर्णयप्रक्रियेत नागरिकांना काही प्रमाणात सहभागी करून घेण्याचा चीनमधील प्रयोग यशस्वी ठरला तर हुकुमशाही राजवट असणारे देश चीनच्या एकपक्षीय अधिकारशाहीचे उदाहरण पुढे ठेवू शकतात, असा अंदाज अभ्यासक व्यक्त करतात. आंतरराष्ट्रीय पटावरही चीन आपला वेगळा ठसा उमटवू पाहात आहे. चीनने आफ्रिकेतील देशांबरोबर अधिक सहकार्य करण्याचे ठरविले आहे. याचा अर्थ आफ्रिकेतील काही देशांमधील हुकूमशहांना चीनचा पाठिंबा आहे, असा काढणे मात्र योग्य ठरणार नाही. कारण, आपले सर्वसमावेशक राष्ट्रीय बल (कॉम्प्रिहेन्सिव्ह नॅशनल पॉवर) जोखणे व ते जगापुढे मांडणे याला जगभरात महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रत्येक देशाचा आर्थिक, राजकीय, लष्करी आणि सांस्कृतिक क्षेत्रांतील ताकदीचा निर्देशांक मोजण्याचे कार्य परराष्ट्र विभागांशी संबंधित 'थिंक टँक्स' करीत आहेत. चीननेही या निर्देशांकाकडे लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले आहे.

## 'सॉफ्ट पॉवर'चा अवलंब

Yang Yi हे चीनमधील लष्करी अधिकारी आणि 'थिंक टँक'चे एक प्रतिनिधी. त्यांच्या म्हणण्यानुसार चीनभोवती अमेरिकेचा एक वेढाच जणू पडलेला आहे. कारण चीनने इतर देशांशी संबंध वाढविण्याचा प्रयत्न केव्हाही केला की अमेरिका त्याकडे 'आपल्या साम्राज्याला धोका' याच दृष्टिकोणातून पाहते. जागतिक घडामोडींमधील निर्णयप्रक्रियेत आपलाच वरचष्मा असावा असे अमेरिकेला वाटते. म्हणून चीनने आता आपल्या 'सॉफ्ट पॉवर'वर (चिनी भाषेत ruan quanli) लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले आहे. राजकीय व्यवहारांमध्ये समोरच्या देशाकडून आपल्याला जे हवे आहे ते, त्याच्या मनात असलेल्या आपल्याबद्दलच्या आकर्षणातून मिळविता येणे व यासाठी कोणत्याही प्रकारचा दबाव वा पैसा खर्च न करावा लागणे म्हणजे 'सॉफ्ट पॉवर'चा अवलंब करणे होय. अमेरिकेने 'अमेरिकन ड्रीम'ची कल्पना मांडली होती त्याचप्रमाणे चीनने 'चायना ड्रीम'ची कल्पना २००६मध्ये मांडली.

'चायना ड्रीम'नुसार आर्थिक विकास, राजकीय सार्वभौमत्व आणि आंतरराष्ट्रीय कायदे या तीन महत्त्वपूर्ण संकल्पनांशी चीन जोडला जाणे अपेक्षित आहे. ज्या देशांमध्ये काही प्रश्न उद्भवतात तेथे संबंधितांना सत्तेवरून दूर करण्याची भाषा अमेरिका करते तर, राजकीय सार्वभौमत्व व सांस्कृतिक भिन्नता या दृष्टिकोणातून चीनने विचार व कृती करण्याचे ठरविले आहे. अमेरिकेची भाषा आर्थिक निर्बंधांची व एकटे पाडण्याची असते तर, चीन मदत व व्यापारी संबंधांवर लक्ष केंद्रित करण्यावर भर देणार आहे. अमेरिका काही देशांबरोबर विशेष संबंध ठेवण्याचा प्रयत्न करते तर चीनने सर्व देशांचे म्हणणे ऐकण्याची तयारी दर्शविली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या विविध विषयांवरील चर्चांमध्ये सहभागी होऊन आंतरराष्ट्रीय राजकारणातील अमेरिकेचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न चीन करीत आहे. चीनमधील बुद्धिवादी गटांचा 'सॉफ्ट पॉवर'ला पाठिंबा आहे, मात्र चीनच्या दीर्घकालीन धोरणाविषयी त्यांच्यात मतभेद आहेत. काही बुद्धिवादी शांततेच्या मार्गाने चीनचा उदय महत्त्वाचा मानतात तर काहींना चीनने नवीन मार्गाने नवीन दिशा चोखाळावी असे वाटते. काही अभ्यासकांच्या मते चीनमध्ये माओंच्या काळात जसे 'मध्यममार्गी' व 'क्रांतिकारी' असे दोन गट होते तशा प्रकारचे दोन गट (उदारमतवादी व 'नीओकॉन्स') चीनमध्ये आता आढळतात.

चीनच्या प्रगतीबाबत व धोरणांबाबत चीनमधील बुद्धिवादी खल करीत आहेत. त्यांच्या चर्चा अभ्यासपूर्ण मासिके, विद्यापीठांमधील चर्चासत्रे आणि इंटरनेट यांमधून गाजत आहेत. याची दखल सरकारी पातळीवर घेतली जात आहे. जागतिक राजकारणातील, अर्थकारणातील चीनचा प्रभाव जसजसा वाढेल तसतशा या चर्चा अधिक महत्त्वाच्या ठरतील, अशी चिन्हे दिसत आहेत. वैचारिकदृष्ट्या एक बंदिस्त देश अशी चीनची प्रतिमा आहे. पण चीनमधील हजारो विद्यार्थी पाश्चात्य देशांमध्ये शिक्षण घेऊन मायदेशी परतले आहेत. परदेशांतील व आपल्या देशातील चांगल्या-वाईट बाबींचा ऊहापोह ते करीत आहेत. विशेष आर्थिक क्षेत्राचा प्रयोग चीनने करून बघितला आहे. अनेक देश त्याचा आदर्श समोर ठेवत आहेत. आता चीनने आणि deliberative democracy आणि regional alliances हे दोन प्रयोग करण्याचे ठरविलेले दिसते. यांतून एक वेगळे 'चायनीज् मॉडेल' आकाराला येईल का आणि काही देशांसाठी ते आदर्श ठरेल का, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. चीनमध्ये राजकीय सुधारणा होतील तेव्हा होतील, पण तोपर्यंत चीनमध्ये काहीतरी वेगळे घडते आहे, हीच अभ्यासकांच्या दृष्टीने एक आशादायी बाब आहे. ✿✿

# ANNOUNCEMENT

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

is pleased to announce the following scheme recently introduced for subscription of the ***Journal of Indian School of Political Economy (JISPE)*** for the Block Period of Three and Five years at a substantial concession resulting in huge savings (up to 33.3%) to the new as well as existing subscribers as under, provided that the subscription amount is remitted in lumpsum on or before 1st July 2008.

| ***Subscription Category*** | ***Yearly Subscription*** | ***Three Year subscription*** | |
|---|---|---|---|
| *Universities & Institutes* | *Rs. 600/-* | *Rs. 1500* | *Rs. 2000/- Plus ** |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 300/-*** | ***Rs. 1000/-*** |
| *Individuals & Colleges* | *Rs. 300/-* | *Rs. 750/-* | *Rs. 1000/-* |
| ***Savings*** | ***Nil*** | ***Rs. 150/-*** | ***Rs. 500/-*** |
| *Savings Per cent* | *Nil* | *16.2%* | *33.3%* |

* Statistical supplement to the special issue of the JISPE on 'Political Parties and Election in Indian States : 1990-2003' comprising 335 pages and costing Rs.325/- absolutely free till stocks last.

**For more details write or email to:**

The Administrative Officer,
Indian School of Political Economy,
'Arthabodh', 968/21-22, Senapati Bapat Road,
Pune 411016

Email : ispe@vsnl.net Phone - 25657132
Fax - 25657697 - 25657210

# आव्हान 'कुटुंबां'ना जपण्याचे !

स्पर्धा, आव्हाने आणि संधी यांनी गाजत असलेल्या चालू शतकात समाजांसमोर विविध क्षेत्रांशी संबंधित अनेकानेक प्रश्न उभे ठाकत आहेत. काही प्रश्नांची उत्तरे सापडत आहेत तर काही अधिक गुंतागुंतीचे बनत आहेत. औद्योगीकरणामुळे तसेच जागतिकीकरणामुळे माणसाच्या जीवनाला वेग आल्याने कौटुंबिक जीवन गुंतागुंतीचे व काहीसे विस्कळित होऊ लागल्याचे चित्र जगभरच आढळू लागले आहे. बदलती आर्थिक, सामाजिक परिस्थिती या विस्कळित चित्रास कारणीभूत आहे, असे दिसते. या संदर्भात आतापर्यंत लिंगभेदाच्या दृष्टिकोणातून स्त्रियांच्या नोकऱ्या हा विषय चर्चेचा बनला असला तरी आता मात्र तो कंपन्या आणि कुटुंबे या दिशेने जात आहे.

मुलींनी शिकायचे की नाही, शिकल्यानंतर नोकरी करायची की नाही इत्यादी प्रश्न एकोणिसाव्या व विसाव्या शतकात चर्चिले गेले. त्यानंतर मुली शिकू लागल्या, नोकऱ्या करू लागल्या. मग विवाहानंतर नोकरी करायची किंवा नाही याची चर्चा होऊ लागली. पण कुटुंबाचे वाढते खर्च, वाढती महागाई, वाढती स्पर्धा, उंचावणारे राहणीमान ध्यानात घेता स्त्रियांना अर्थार्जनासाठी घराबाहेर पडणे भागच पडले. त्यामुळे विवाहानंतर अर्थार्जनात खंड पडण्याचा काळही मागे पडला. अलीकडे तर बहुतेक सर्वच क्षेत्रांतील नोकऱ्यांत मुली व स्त्रिया सहभागी झालेल्या दिसतात. स्त्रियांनी नोकऱ्या करण्याच्या सुरुवातीच्या काळापासून आजघडीपर्यंत कुटुंब सांभाळायचे कुणी, हा यक्षप्रश्न कुटुंबांपुढे उभा ठाकला आहे. विशेषतः आताच्या विभक्त कुटुंबपद्धतीत त्याचे गांभीर्य अधिकच वाढले आहे. स्त्रिया अर्थार्जनासाठी बाहेर पडल्या तरी कुटुंबव्यवस्थेच्या दृष्टीने घराघरांत ताण निर्माण होतो आणि तिने अर्थार्जन केले नाही तरी कमावणारी व्यक्ती एकच असल्याने घराघरांत आर्थिक ताण निर्माण होतो. गृहिणी असलेल्या स्त्रियांचे प्रश्न बाजूला ठेवले तर नोकरदार स्त्रियांच्या बाबतीत काय घडते ? या स्त्रियांसाठी मुलांचे संगोपन व ज्येष्ठांची काळजी हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न बनला आहे, असे दिसते. अशा वेळी 'इकडे आड, तिकडे विहीर' अशी कुटुंबांची परिस्थिती बनते. या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर न सापडल्याने बहुतांश स्त्रिया मुलांच्या संगोपनासाठी नोकरी सोडण्याचा वा अर्धवेळ नोकरीचा पर्याय अवलंबितात, असे आढळले आहे.

शिवाय, यामुळे स्त्रियांची कौशल्ये, ज्ञान व क्षमता यांचा समाजाला पुरेसा उपयोग होत नाही, ते वेगळेच. याला hidden brain drain असेही म्हटले जाते. राहणीमानाला व करिअरला प्राधान्य देताना मुलांच्या संगोपनासाठी पुरेसा वेळ देणे शक्य होणार नाही हे जाणून असणारी तरुण जोडपी DINK (double income, no kids) गटाकडे झुकत आहेत. त्यामुळे अशा कौटुंबिक प्रश्नांचा ऊहापोह अनेक देशांत होऊ लागला आहे. ब्रिटनमध्येही हा विषय चर्चिला जातो आहे. 'विविध क्षेत्रांतील नोकऱ्यांमधील स्त्रियांची स्थिती, अपेक्षा व अडचणी' या विषयांबाबत वेगवेगळे अभ्यासही करण्यात येत आहेत. त्यावरून असे आढळते की, मुली शिकतात आणि चांगल्या नोकऱ्याही मिळवतात. त्यांच्या क्षमताही चांगल्या असतात आणि २० ते ३० या वयोगटातील तरुण मुली तरुण मुलांच्या बरोबरीने चांगला पगारही मिळवतात. एखाद्या कंपनीतील अविवाहित तरुण मुले व मुली आणि नवविवाहित स्त्री व पुरुष यांच्या कामात व पगारात फारशी तफावत आढळत नाही. जी तफावत असते त्यामागे या तरुण मुली पगाराचा मुद्दा रेटून धरत नाहीत हे मुख्य कारण असते. पण नवविवाहित स्त्रियांच्या बाबतीत पहिल्या मुलाच्या जन्मानंतर ही परिस्थिती एकदम बदलते. त्यांना कार्यालयीन जबाबदारी, मुलांचे संगोपन व गृहव्यवस्थापन अशा तीनही आघाड्या लढवाव्या लागतात. येथून स्त्री व पुरुष यांच्या नोकरीतील समानता संपुष्टात येते. अपत्यप्राप्तीनंतर स्त्रियांच्या अर्थार्जनावर एकदम परिणाम होतो. कारण, एक तर अनेक स्त्रिया नोकऱ्या सोडतात किंवा नोकऱ्यांच्या जगात आपले स्थान टिकविण्यासाठी अर्धवेळ नोकरीचा मार्ग पत्करतात.

त्यामुळे त्यांना मिळणाऱ्या पगारात घट होते. पुरुषांना मिळणारे वेतन आणि स्त्रियांना मिळणारे वेतन यांतील दरी वाढते. ब्रिटनमधील एका अभ्यासानुसार असे आढळते की पुरुषांना मिळणाऱ्या वेतनाच्या सुमारे ११ टक्के कमी पगार २० ते ३०या वयोगटातील स्त्रियांना मिळतो, तर ३० ते ४० वयोगटात हे प्रमाण २३ टक्के इतके आहे. अर्धवेळ नोकऱ्या करणाऱ्या स्त्रियांच्या बाबतीत तर ही दरी अधिकच रुंदावते. अपत्यप्राप्तीनंतर नवविवाहित पुरुषांच्या वेतनात बदल होत नाहीत. उलट, ते अधिक वेळ काम करतात आणि अधिक वेतन मिळवितात. अपत्यप्राप्तीनंतर स्त्री-पुरुषांच्या वेतनातील वाढलेली तफावत ही केवळ लिंगभेदामुळे होते असे नाही. त्यासाठी तीन घटक जबाबदार ठरतात - (१) स्त्रिया व पुरुष वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करतात. उाहरणार्थ स्त्रिया प्रामुख्याने शिक्षण, किरकोळ व्यापार व आरोग्यसेवा (नर्सिंग)

अशा मुळातच कमी वेतनश्रेणी असलेल्या क्षेत्रांत नोकऱ्या करतात. (२) एकंदरीतच वेतनातील दरी वाढल्याने त्याचा एक परिणाम स्त्री-पुरुषांच्या वेतनातील तफावत वाढण्यात होतो. (३) स्त्रियांनी अर्धवेळ नोकऱ्यांना प्राधान्य दिल्याने त्यांच्या रोजगाराच्या संधी कमी होण्याच्या शक्यता वाढतात आणि नोकऱ्यांच्या विश्वात त्या उतरणीच्या मार्गाकडे झुकतात. ब्रिटनमधील समान संधी आयोगाने (Equal Opportunity Commission) याला hidden brain drain असे संबोधले आहे.

या संदर्भात ब्रिटनमध्ये Single Equality Actची चर्चा चालू आहे. त्यानुसार कंपन्यांना equal-pay audit करणे बंधनकारक होणार आहे. स्त्री-पुरुष समानतेच्या समर्थकांना ही आशेची बाब वाटत असली तरी यामुळे फार काही घडेल असे नाही. कारण, अनेक कंपन्या लिंगभेद करून स्त्रियांना वेतन कमी देतात असे नाही तर, अपत्यप्राप्तीनंतर स्त्रियाच वेगळ्या नोकऱ्या स्वीकारतात, त्यामुळे त्यांना योग्य वेतन मिळत नाही, असे कामगारविषयक अभ्यासक म्हणतात. अर्धवेळ काम केल्याने वा कौटुंबिक गरजांनुसार इतर नोकऱ्यांना प्राधान्य दिल्याने त्यांच्या कामाचे स्वरूपही बदलते. म्हणजे व्यवस्थापक पदावरील स्त्रिया त्यापेक्षा कमी दर्जा असलेल्या पदांवर काम करतात तर, अर्धवेळ काम करणाऱ्या स्त्रियांचा अनुभव कमी होतो व घराची जबाबदारी असल्याने काही कालावधीसाठी तरी त्या मोठ्या जबाबदारीपासून दूर जाण्याचा प्रयत्न करतात. चार-पाच वर्षांपेक्षा कमी वयाची मुले असताना पूर्णवेळ नोकरी करण्याला फक्त एकतृतीयांश स्त्रिया प्राधान्य देतात. शिक्षण किंवा नर्सिंग या क्षेत्रांत स्त्रियांनी अर्धवेळ नोकरी केली तरी त्यांच्या कामाचा दर्जा व पद यांवर परिणाम होत नसल्याने अनेक स्त्रिया या क्षेत्रांतील नोकऱ्यांकडे वळतात.

मुलांच्या संगोपनासाठी स्त्रिया नोकऱ्यांमध्ये तडजोड करतात ही बाब येथे लक्षात घेणे जरुरीचे आहे. आपल्या अपत्यासाठी आपणच वेळ दिला पाहिजे, असे अनेक स्त्रियांना वाटते. कारण, त्यांच्या मते स्त्री-जीवनातील हे त्यांचे एक कर्तव्य असते, तसेच त्यांची ती एक जबाबदारीही असते. मुलांच्या संगोपनात त्यांना समाधान मिळते आणि आनंदही. मुलांच्या संगोपनाबाबत पूर्वापार चालत आलेली श्रमविभागणी बहुतांश स्त्री-पुरुषांना योग्य वाटते असेही अभ्यासांतून आढळते. हा दृष्टिकोण बदलला जावा असे मत मांडतानाच या परंपरागत दृष्टिकोणाचा आदरही केला पाहिजे असे मतही व्यक्त करण्यात येते. समानतेचा आग्रह धरणाऱ्या अनेक स्त्रियादेखील मातृत्वाचे महत्त्व ओळखून असतात, हे उल्लेखनीय.

काही अभ्यासकांनी असे सूचित केले आहे की मातृत्व ही स्त्रियांच्या जीवनातील एक 'आयडेन्टिटी' असते, असे स्त्रियांना वाटते. त्यामुळे श्रमांच्या बाजारपेठेतील त्यांचे निर्णय असे अतार्किक (irrational) वाटू शकतात. श्रमांच्या बाजारपेठेतून स्त्रिया बाहेर पडू नयेत आणि उत्पादन व सेवा यांवर विपरित परिणाम होऊ नये यासाठी काही उपाय सुचविले जातात. स्त्रियांचे ज्ञान, त्यांची कौशल्ये यांचा उपयोग व्हावा असे म्हणणारा गट, मुलांच्या संगोपनावर सरकारने अधिक खर्च करावा म्हणजे स्त्रियांना नोकऱ्या करता येतील असे म्हणतो. पण स्त्रिया रोजगाराबाहेर पडल्याने उत्पादकता किती प्रमाणात घटते आणि त्यांचा रोजगार कायम राहावा यासाठी सरकारने किती खर्च करावा याचे गणित जुळणे कठीण असल्याचे मत मांडण्यात येते. काही अभ्यासक असेही म्हणतात की, बहुतांश स्त्रियांना आपले कामाचे तास कमी करून आहे तेच पद राखून नोकरीत टिकण्याचा पर्याय उपलब्ध नसतो. त्याचप्रमाणे अनेकदा पुरुषांनादेखील स्त्रियांची जबाबदारी वाटून घेण्याचा पर्याय उपलब्ध नसतो, हे ध्यानात घेण्याची गरज आहे.

अशा परिस्थितीत काय करता येईल ? कर्मचाऱ्यांना कौटुंबिक समाधान मिळून त्यांची कार्यक्षमता वाढावी यासाठी स्त्री-पुरुषांना अनेकानेक पर्याय उदारमतवादी देशांनी उपलब्ध करून द्यावेत, असे काही अभ्यासक सुचवितात. पण अपत्यप्राप्तीनंतर पूर्वी करीत असलेलेच काम अर्धवेळ करण्याचा आणि आहे ते पद कायम ठेवण्याचा पर्याय स्त्रियांना देता येईल का, द्यावा का, असा प्रश्न या संदर्भात उपस्थित होतो. अर्धवेळ काम करण्याची मुभा स्त्रियांना देण्यास मालकवर्ग तयार असतो. पण त्याच वेळी एका व्यक्तीमागे कंपनी करीत असलेला प्रशिक्षणविषयक व इतर खर्च लक्षात घेऊन अर्धवेळ काम करणाऱ्या स्त्रियांची सेवाज्येष्ठता मान्य करण्यास मालकवर्ग तयार नसतो. कामाचे लवचीक तास ही संकल्पना मात्र राबविली जात आहे. कंपनीचे कोणतेही नुकसान न करता एखादे काम जर अर्धवेळ करणे शक्य असेल तर कर्मचाऱ्यांना ते काम अर्धवेळ करण्याची मुभा असावी आणि ते विशिष्ट काम अर्धवेळात होऊ शकत नाही हे सिद्ध करण्याची जबाबदारी कंपनीची असावी, असेही सुचविण्यात आले आहे. हॉलंडमध्ये असा प्रयोग करून पाहण्यात येत आहे. पुरुषांनाही या पर्यायाचा वापर करता येणे शक्य आहे. त्यामुळे बालसंगोपनाची जबाबदारी एकट्या स्त्रीवरच राहणार नाही. बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे कुटुंबांना शक्य होण्यासाठी कुटुंबांशी मैत्री करणाऱ्या धोरणांची दिशा कंपन्यांनी पकडणे योग्य ठरावे असे म्हटले जाते. ✿✿

# गुंता लोकसंख्येच्या बदलत्या धाटणीचा

सध्याचे शतक हे आशिया खंडाचे असल्याचा उद्घोष विविध व्यासपीठांवरून सतत करण्यात येत असतो. जगभरातील उभरत्या आर्थिक महासत्तांमध्ये ज्यांचा अंतर्भाव आवर्जून केला जातो अशा चीन आणि भारत या दोन अग्रगण्य अर्थव्यवस्था आशिया खंडात असल्यामुळेच हा बोलबाला आहे. त्यातच पुन्हा, चिनी अर्थव्यवस्था ही वस्तुनिर्मितीप्रधान तर भारतीय अर्थव्यवस्था ही सेवाप्रधान असल्याने उद्याच्या जगाला होणारा बस्तू तसेच सेवांचा पुरवठा हा मुख्यत्वे याच दोन देशांकडून बऱ्यापैकी निर्धारित होईल, या शक्यतेचा एक पदरही या गवगव्याला जोडलेला आहे. त्यातच, आजच्या ज्ञानाधिष्ठित अर्थकारणात कळीचे ठरणारे मनुष्यबळ हे या उभय देशांकडे मुबलक प्रमाणात असल्याने जागतिक अर्थकारणावरील त्यांची अधिसत्ता प्रदीर्घ काळपर्यंत अबाधित राहील, असेही एक तर्कशुद्ध प्रतिपादन या संदर्भात केले जाते. त्यातल्या त्यात पुन्हा चीनच्या तुलनेत भारतीय लोकसंख्या आणि विशेषत: मनुष्यबळाची वयानुसारी जडणघडण ही दीर्घकालीन आर्थिक विकासाला अधिक पूरक असल्याचेही आकडेवारीनिशी दाखले दिले जातात.

हे सगळे बव्हंशी खरे असले तरी या चित्राची एक दुसरी बाजूही आहे. चीन, भारत आणि जपान या तीन आशियाई सत्तांच्या लोकसंख्येची आजची आणि उद्याची जडणघडण ही एका परीने सचिंत बनवणारी अशीच आहे. भारतीय लोकसंख्येची वयानुसारी विद्यमान जडणघडण लक्षात घेता, तिच्यात वय वर्षे १५ ते ५९ या आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि सक्रिय वयोगटातील सदस्यांचे प्रमाण हे चांगले घसघशीत असल्याने 'डेमॉग्रफिक डिव्हिडन्ड'चा लाभ भारताला इथून पुढे मिळेल हे खरेच. परंतु, हा लाभांश काही चिरकाल मिळणारा नाही. या संदर्भात सादर केली जाणारी सांख्यिकी मोठीच मननीय आहे. साठीच्या वर वय असलेल्या भारतीयांची संख्या २००५साली सुमारे पावणेनऊ कोटींच्या आगेमागे होती. २०१० सालापर्यंत हीच संख्या साधारणपणे ११ कोटींपर्यंत वाढावी, असा एक अंदाज वर्तविला जातो. आजची तरुणाई जेव्हा प्रौढत्वाचा टप्पा गाठत वा पार करत असेल तेव्हा, म्हणजे साधारणपणे २०५०सालाच्या आसपास, तत्कालीन लोकसंख्येतील प्रौढ आणि वयस्करांची संख्या चांगली ३३

कोटींवर पोहोचली असेल, असे या संदर्भातील सांख्यिकी अंदाज सांगतात. म्हणजेच, स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारताची एकूण लोकसंख्या जेवढी होती तेवढ्या संख्येने प्रौढ आणि वयोवृद्ध नागरिकच उद्याच्या भारतात विद्यमान असतील !

खरा प्रश्न आहे तो इथेच. विशेषतः, लोकसंख्या संक्रमणाच्या ज्या अवस्थेत भारत आज आहे ती अवस्था या संदर्भात अधिकच महत्त्वाची ठरते. एकंदरच जननदरात घट घडून आल्याने कुटुंबांचा सरासरी आकार कमी झाला आहे, होत आहे. ही बाब खास करून शहरांत तर विशेषच जाणवते. मधल्या स्तरातील आणि उच्च स्तरातील मध्यमवर्गियांमध्ये तर एकाच अपत्यावर थांबण्याची दांपत्यांची प्रवृत्ती वाढताना दिसतो. कुटुंबातील दोघेही घटक कमावते असतील तर मूल न होऊ देण्याकडेही आताशा कल वळतो आहे. परिणामी, आजचे तरु ण उद्या वयस्कर होतील तेव्हा त्यांच्या संगोपनाचा प्रश्न गंभीर होत असल्याचे आताशा जाणवू लागले आहे. इथे भाग केवळ मानसिक वा भावनिक बाबींचा नाही. हा प्रश्न तेवढाच आर्थिकही बनतो आहे. कारण, एकीकडे समाजातील प्रौढ आणि वृद्धांचे प्रमाण वाढणार आहे आणि त्याच वेळी वैद्यकीय ज्ञान तसेच सेवासुविधांमधील विलक्षण सुधारणांमुळे सरासरी भारतीयांचे आयुर्मानही वाढते आहे. अशा परिस्थितीत, या ज्येष्ठ नागरिकांच्या सेवानिवृत्ती वेतनाचा प्रश्न गंभीर बनणार आहे. कारण, लोकसंख्येमध्ये वयोवृद्धांचे प्रमाण वाढू लागले की त्याचा अपरिहार्य परिणाम हा त्या समाजातील अवलंबन गुणोत्तर वाढण्यावर होतो. लोकसंख्येतील तुलनेने कमी असणाऱ्या आर्थिकदृष्ट्या सक्षम घटकांना संख्यात्मकदृष्ट्या मोठ्या आणि आर्थिकदृष्ट्या परावलंबी अशा असलेल्या समाजघटकांचा भार पेलावा लागण्यात त्याची परिणती होते.

त्यातही, आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमानंतर एकंदरच भारतीय अर्थव्यवस्थेत ज्या प्रकारची रोजगारनिर्मिती होताना दिसते त्यामुळे तर ही बाब अधिकच व्यामिश्र बनते. मुळातच मूठभर असलेला भारतातील संघटित रोजगार गेल्या १६-१७ वर्षांमध्ये विलक्षण मंद गतीने वाढलेला दिसतो. रोजगारात जी काही वाढ घडून आली आहे ती मुख्यत्वेकरून असंघटित रोजगार क्षेत्रातच घडून येत आहे. हे रोजगार क्षेत्र कोणत्याही प्रकारच्या सामाजिक सुरक्षा छत्रापासून वंचित असेच आहे. त्यामुळे, मजा अशी होणार आहे की, कोणत्या ना कोणत्या स्वरूपातील सामाजिक सुरक्षेची निकड भासणाऱ्या समाजघटकांमध्ये आगामी काळात संख्यात्मक वाढ घडून येत असतानाच, सरकारच्या माध्यमातून त्या बाबतची आर्थिक तरतूद केली जावी यासाठी वित्तीय

पाठबळ पुरविणाऱ्यांच्या अथवा पुरवू शकणाऱ्या रोजगार वा समाजघटकांच्या प्रमाणात मात्र घट संभवते. आगामी भविष्यातील निवृत्तिवेतनविषयक धोरणासंदर्भात या साऱ्या घडामोडी अतिशय संवेदनशील ठरतात. समाजातील वयोवृद्धांच्या निवृत्तिवेतनासारख्या सामाजिक सुरक्षा उपायांची तरतूद करणे, ही खरी म्हणजे, तरुणाईने आपल्या आधीच्या पिढीप्रती व्यक्त केलेली जणू कृतज्ञताच. परंतु, आगामी काळात व्यस्त होऊ घातलेले अवलंबन गुणोत्तर आणि देशातील रोजगार क्षेत्रात घडून येत असलेले गुणात्मक बदल ध्यानात घेता सरकारसह सगळ्याच संबंधितांना येणाऱ्या काळात तारेवरची कसरत करावी लागेल, अशीच सारी चिन्हे आहेत.

अर्थात, हे सारे केवळ भारतातच घडते आहे असेही समजण्याचे कारण नाही. जपान आणि चीन हे आपले आशियाई शेजारीही याच कसोटीतून गेले आहेत वा आजही जात आहेत. जपानमधील जन्मदरात अलीकडील काही दशकांत झपाट्याने घट घडून आल्याचे अनुभवास येते. सर्वसाधारण जपानी महिलेच्या ठायी होणाऱ्या अपत्यधारणेचे प्रमाण १९६५च्या सुमारास सरासरी २.१४ इतके होते. २००५ साली तेच १.२६ वर घसरले. २००७सालच्या जानेवारी महिन्यात प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार, हे चित्र अंमळ सुधारलेले दिसते - म्हणजे झाले इतकेच की सरासरी अपत्यधारणा १.२६ वरून १.२९ वर पोहोचली ! परंतु, लोकसंख्येचे आकारमान टिकवून धरण्यासाठी, सातत्यशील राखण्यासाठी ही वाढ (?) पुरेशी अजिबातच नाही. या सगळ्याचा इत्यर्थ एवढाच की आगामी शतकभरादरम्यान जपानची लोकसंख्या आजच्या तुलनेत निम्म्यावर उतरेल. जपानच्या लोकसंख्येत घट घडून येण्यास २००५ साली पहिल्यांदाच सुरुवात झाली. इतिहासात हे प्रथमच घडले. जपानची एकंदर लोकसंख्या ४हजार ३६१ ने घटली. एकीकडे वाढते आयुर्मान आणि दुसरीकडे लोकसंख्येत पडणारी भरही आक्रसते आहे, या अडकित्यात सापडलेल्या जपानमध्ये पहिला सुरुंग लागला तो तिथल्या निवृत्तिवेतनाच्या वित्तीय अधिष्ठानाला.

चीनमधील चित्रही काही फारसे निराळे नाही. चीनच्या शहरी भागांत १९९७ नंतर घडून आलेली रोजगार वाढ ही बव्हंशी असंघटित क्षेत्रातच सामावली गेली. साहजिकच, चीनमध्ये अस्तित्वात असलेल्या सामाजिक निवृत्तिवेतन योजनेत सहभागी होणे हे या क्षेत्रात रोजीरोटी करणाऱ्यांना शक्य नाही आणि त्यांना त्यांत रस असणेही संभवत नाही. परिणामी, या योजनेची व्याप्ती मर्यादितच राहिलेली दिसते. यातून, उद्याच्या चीनपुढेही उग्र आव्हाने उभी राहावीत यात अचिंत्य असे काय आहे ? ✿✿

*(पान ३ वरून )*

हा एक प्रकारे माणसाचा शिक्षकच असतो. निसर्गाकडून शिकताशिकता त्याचा ऱ्हास करण्यातही मानव आघाडीवर आहे. विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे औद्योगीकरणाला चालना मिळाली आणि जागतिकीकरणामुळे तर या प्रगतीला प्रचंड वेग मिळाला. यातच निसर्गाचा ऱ्हास अधिक वेगाने होऊ लागला. या ऱ्हासाकडे दुर्लक्ष करीत विकासवेगावर स्वार होणाऱ्या माणसाचे कौटुंबिक जीवन एकीकडे प्रगतीच्या दिशेने गेले तर दुसरीकडे त्यामुळे काही कौटुंबिक आव्हानेही उभी राहिली. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी पुन्हा एकवार नवदिशेची, नवविचारांची कास धरण्याची गरज निर्माण झाली आहे. युरोपीय देशांमध्ये याबाबत काही घडते आहे. नवदिशेकडे जाणाऱ्या अशा काही घटनांचा वेध घेण्याचा प्रयत्न 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात केला आहे.

---

*(पान ४ वरून )*

तोच मजकूर टंकलिखित स्वरूपात खालीच सादर केला आहे. समाजात विविध स्तरांवर चालू असणाऱ्या वैचारिक उपक्रमांप्रती तेंडुलकर यांना किती जिव्हाळा आणि आस्था होती, याचे दर्शन त्यांच्या या पत्रातून घडते.

*'अर्थबोधपत्रिके'तील सध्याचे विषयांतील वैविध्य आणि थोडक्या जागेत एकेक विषयाचे सार-रूप विवेचन मला विचाराला प्रवृत्त करणारे वाटत असते. अशा पत्रिकेला मर्यादा असणार. परंतु या मर्यादांत तुम्ही काढता ते अंक, संपूर्ण आणि लक्षपूर्वक वाचावेत असे असतात. बदलत्या विचाराच्या दिशा, महत्त्वाच्या क्षेत्रातल्या घटना तुम्ही 'माहिती' म्हणून आम्हाला नियमितपणे पुरविता, हे तुमचे आमच्यावरील ऋणच आहे. कधीकधी मात्र माहितीचा संकोच जास्त होतो आणि माझ्यासारख्या मर्यादित आकलनाच्या वाचकाची अडचण होते. श्रद्धा व तर्कबुद्धी हे टिपण उदाहरण म्हणून देतो. हा विषयही तत्त्वज्ञानात्मक, गहन व abstract. त्यात विषयाचा संकोच करताना भाषा फार जड झाली आहे. ती dense ही झाली आहे. अर्थबोध न होणारा काही भाग यात आहे. तक्रार म्हणून हे लिहिले नाही. तुमचा प्रयत्न मला महत्त्वाचा वाटतो म्हणून लिहिले.*

*विजय तेंडुलकर, २५ जानेवारी २००२*

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

## प्रमुख संदर्भ

(1)NewScientist, 26 April 2008, pp. - 29-31 (2) Prospect, March 2008, pp.- 26-32 (3) New Statesman, 24 March 2008, pp -28-30 (4) Far Eastern Economic Review -May 2007, pp - 50-61 (4) en.wikipedia.org/wiki/Cuttlefish (5)www.tonmo.com/articles/basiccuttlefish.php

■■

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ

# कर्ता-करविता

### आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

● मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रुपये

**ग्रंथ घेणाऱ्यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

(१ जून २००६ पासून)

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | फक्त १०० / - रुपये |
| द्वैवार्षिक वर्गणी | फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट |
| त्रैवार्षिक वर्गणी | फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट |
| पंचवार्षिक वर्गणी | फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट |

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## कर्जमाफी की ग्रामीण पतसंस्थांची मृत्युघंटा ?

- नीळकंठ रथ

चालू आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प संसदेत सादर करीत असताना २९ फेब्रुवारी २००८ रोजी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणात केंद्रीय अर्थमंत्र्यांनी शिक्षण, आरोग्य तसेच शेती यांसारख्या क्षेत्रांसाठी वित्तीय तरतुदींचे नानाविध प्रस्ताव सादर केले. परंतु, प्रसारमाध्यमे, सर्वसाधारण जनता आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांचे त्यांकडे फारसे लक्ष गेल्याचे दिसत -जाणवत नाही. लहान व सीमान्त शेतकऱ्यांना पतसंस्थांनी दिलेल्या कर्जांना जाहीर करण्यात आलेल्या माफीनेच सगळ्यांचे ध्यान आपल्याकडे खेचून घेतले. कर्जमाफीची ही रक्कम ६० हजार कोटी रुपयांच्या घरात जाते. 'एक क्रांतिकारी पाऊल' अशा शब्दांत पंतप्रधान तसेच काँग्रेस अध्यक्षांनी या कर्जमाफीचे वर्णन ती जाहीर झाल्यापासून अवघ्या दोन दिवसांतच केले. तर, या कर्जमाफीमुळे शेतीक्षेत्रातील उत्पादनवाढीस चालनाच मिळेल, असे भविष्यकथन केंद्रीय अर्थमंत्र्यांनीही पाठोपाठच केले.

दोन हेक्टरपर्यंत (साधारणपणे पाच एकर) क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांना सहकारी पतसंस्था तसेच व्यापारी बँकांनी दिलेल्या कर्जांना सव्याज माफी जाहीर करण्यात येत असल्याचे सरकारी घोषणेत म्हटले आहे. ३१ मार्च २००७ रोजी शेतकऱ्यांकडे असलेल्या थकित रकमेचा या कर्जमाफीत अंतर्भाव आहे. तर, दोन हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या नावावर ३१ मार्च २००७ रोजी असणाऱ्या एकूण थकबाकीपैकी २५ टक्के रकमेची कर्जमाफी मिळणार आहे. त्या नंतर, खासगी सावकारांकडून घेतलेल्या कर्जांचे रूपांतरही कमी व्याजदराच्या बँककर्जांमध्ये करण्यात येऊन यथावकाश तेही माफ केले जावे, अशी मागणी देशाच्या विविध भागांतील शेतकऱ्यांनी केली. बिगर परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जांची परतफेड शेतकऱ्यांनी करू नये, असा सल्लाही केंद्रीय कृषिमंत्र्यांनी शेतकऱ्यांना दिला. कर्जवसुलीसाठी अशा खासगी सावकारांनी शेतकऱ्यांना तोशीस देण्याचा प्रयत्न केलाच,

तर संबंधित राज्यसरकारांनी त्या संदर्भात योग्य ती उपाययोजना करण्याबाबत केंद्र सरकार राज्यांना सांगेल, असेही ते पुढे म्हणाले.

कर्जमाफीसंदर्भात माध्यमांनी मुख्यत्त्वे तीन प्रश्न उपस्थित केले आहेत : आगामी निवडणुकांवर डोळा ठेवून हे पाऊल उचलले गेले आहे, हा झाला त्यातील पहिला मुद्दा. कर्जमाफी अंमलात आणल्यानंतर संबंधित बँका व पतसंस्थांना भरपाई देण्यासाठी सरकार पैसा कोठून उभा करणार, हा झाला दुसरा मुद्दा. तर, बिगर शेती कर्जांचे काय, हा झाला तिसरा मुद्दा. परंतु, ग्रामीण भागांतील पतसंस्थांवर त्याचप्रमाणे, एकंदरच शेतकरीवर्गावर या कर्जमाफीचे कोणकोणते परिणाम संभवतात यांबाबत मात्र फारसे प्रश्न कोणी उपस्थित केल्याचे ऐकिवात नाही.

शेतकऱ्यांची कर्जे माफ केली जाणे, ही बाब आपल्या देशात नवीन नाही. विश्वनाथ प्रताप सिंग हे पंतप्रधान असतानाही अर्थसंकल्पाच्या सादरीकरणादरम्यान १९९०च्या मार्च महिन्यात अशाच प्रकारची घोषणा करण्यात आली होती. जाहीर करण्यात आलेल्या कर्जमाफीबद्दल, त्या वेळी, व्यापारी बँकांना केंद्र सरकार भरपाई देणार होते तर, सहकारी पतसंस्थांना द्यावयाच्या भरपाईची जबाबदारी केंद्र सरकार आणि राज्य सरकारे समसमान विभागून घेणार होते. गेल्या सुमारे तीन ते चार दशकांचा इतिहास बघितला, तर, राज्य सरकारांनीही अशाच प्रकारच्या कर्जमाफीविषयक घोषणा केव्हा ना केव्हा केल्या असल्याचे दिसून येते. एकदाच उचललेले पाऊल, असे या कर्जमाफीचे स्वरूप असल्याचा आजवरच्या इतिहासाचा दाखला नाही. अशीच कर्जमाफी वेळोवेळी जाहीर होईल, अशी शेतकऱ्यांचीही धारणा बनली आहे.

सहकारी पतसंस्था तसेच व्यापारी बँकांकडून शेतकऱ्यांना केल्या जाणाऱ्या पतपुरवठ्यात १९९० च्या मार्च महिन्यात करण्यात आलेल्या कर्जमाफी घोषणेनंतर घट घडून आली होती. त्या मागे अनेक कारणे होती. कर्जमाफीपायी पतसंस्था तसेच बँकांवर पडणाऱ्या बोजाची भरपाई एका दमात करण्यासारखी सरकारांची परिस्थिती नव्हती. भरपाईची पूर्तता होण्यास अनेक वर्षे लागली. साहजिकच ज्या व्यक्ती तसेच संस्थांच्या नावावर थकबाकी होती त्यांना नव्याने कर्जे मिळू शकली नाहीत. आपली फसवणूक झाली, अशी भावना कर्जमाफी जाहीर होण्यापूर्वीच रीतसर कर्जे फेडलेल्या शेतकऱ्यांमध्ये बळावली. साहजिकच, नव्याने घेतलेल्या कर्जांची परतफेड करण्याबाबत ते नाखूष होते. अशीच कर्जमाफी वेळोवेळी मिळत जाईल यांबाबतची खातरजमा कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांमध्ये पसरल्याने नव्याने घेतलेल्या कर्जांची

फेड करण्याबाबत तेही उदासीन बनले. त्याच वेळी, पूर वा दुष्काळ वा चक्रीवादळांपायी पिके हातची गेल्याने कर्जाची परतफेड शेतकऱ्यांना अशक्य बनून थकबाकी निर्माण होतच होती. त्यातच, १९९१ साली जाहीर झालेल्या नवीन आर्थिक धोरणाने सार्वजनिक क्षेत्रांतील व्यापारी बँकांच्या नफाप्रदतेवर भर दिला. बँकांच्या थकित कर्जांमध्ये घट घडवून आणण्यावरही त्या नवीन धोरणाचा कटाक्ष होता. परिणामी, या नवीन धोरणाची निष्पत्ती व्यापारी बँकांकडून शेतीला होणाऱ्या कर्जपुरवठ्यात कपात होण्यात झाली. राष्ट्रीय नमुना पाहणी संस्थेने २००२ साली केलेल्या एका सर्वेक्षणाचे या संदर्भातील निष्कर्ष मोठे मननीय आहेत. शेतीक्षेत्राला होणाऱ्या संस्थात्मक कर्जपुरवठ्यात सर्वत्रच लक्षणीय घट झाल्याचे वास्तव या सर्वेक्षणाने पुढे आणले. याला अपवाद केवळ दोन राज्यांचा. ती राज्ये म्हणजे गुजरात आणि महाराष्ट्र. कृषिक्षेत्राला संस्थात्मक पतपुरवठा होण्यात सहकारी तत्वावरील दूध खरेदी -विक्री संघ आणि सहकारी साखर कारखान्यांची भूमिका या दोन राज्यांत महत्वाची असल्यानेच त्यांचे या बाबतीतील चित्र निराळे दिसत असावे.

सहकारी तत्वावरील कृषि पतपुरवठा संस्थांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी पावले उचलण्याऐवजी, 'नाबार्ड'सारख्या संस्थांनी, ग्रामीण भागांत नव्याने उदयास येत असणाऱ्या बचत गटांमध्येच अधिक रस दाखविला. स्वतःच्या बळावर वा एखाद्या स्वयंसेवी संस्थेच्या प्रयत्नांद्वारे स्थापन झालेले हे गट आपल्या सदस्यांच्या बचतीचे नियमितपणे संकलन करून त्या निधीमधूनच गटातील गरजूंना रीतसर कर्जवाटप बिनबोभाटपणे करत असल्याचे पाहून, या गटांनाच स्वस्त व्याजदराने भरभक्कम कर्जपुरवठा करून त्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागांतील पतपुरवठ्यात वाढ घडवून आणण्याचे धोरण अंगिकारण्याचे 'नाबार्ड'ने ठरविले.

शेतीमधील उत्पादनवाढ तसेच भांडवली गुंतवणुकीसाठी मोठ्या प्रमाणावर वित्तपुरवठा करून शेतीच्या विकासास गेली पाच दशके हातभार लावणाऱ्या ग्रामीण भागांतील सहकारी पतपुरवठा संस्थांची वित्तीय स्थिती खालावत असल्याचे बघून, या संस्थांचे पुनरु ज्जीवन घडवून आणण्यासाठी काय उपाययोजना आखावी यांबाबत अभ्यास करून शिफारशी करण्यासाठी केंद्रीय नियोजन आयोगाने एका समितीची नियुक्ती केली. भागभांडवल, शासनातर्फे केली जाणारी सर्व प्रकारची वित्तीय मदत आणि कर्जपुरवठा, त्याचप्रमाणे कामकाजासाठी नेमले गेलेले सरकारी कर्मचारी अशा विविध स्वरूपांत या संस्थांमध्ये असणारा सरकारचा सहभाग पूर्णपणे काढून घेऊन,

सर्वस्वी स्वतंत्र आणि केवळ सदस्यप्रधान संस्था असेच स्वरूप या ग्रामीण सहकारी पतपुरवठा संस्थांना बहाल करणे हाच त्यांच्या पुनरुज्जीवनाचा एकमात्र मार्ग आहे, या निर्णयाप्रत 'वैद्यनाथन समिती' असे नामाभिधान असलेली ही समिती आली. राज्य सरकारांची वित्तीय देणी परत करून, सहकारी पतपुरवठा संस्थांमध्ये असणाऱ्या सरकारच्या वित्तीय सहभागातून या संस्थांना मुक्तता प्रदान करण्यासाठी एकंदर १४ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याची शिफारस या समितीने केली आहे. केंद्रीय नियोजन आयोगाच्या ब्रह्मप्रकाश समितीने तयार केलेल्या सहकाराच्या 'मॉडेल ॲक्ट'च्या मसुद्यानुसार राज्यांनी आपापल्या सहकार कायद्यात दुरुस्त्या -बदल घडवून आणावेत, अशीही एक शिफारस वैद्यनाथन समितीने केली आहे. पंतप्रधान तसेच केंद्रीय अर्थमंत्र्यांनी वैद्यनाथन समितीच्या या शिफारशी स्वीकारल्याही आहेत.

परंतु, वैद्यनाथन समितीने अंदाजित केलेली रक्कम राज्य सरकारांकडे सुपूर्त करणे केंद्रशासनास शक्य व्हावे यासाठी राज्यांनी कोणकोणती पावले उचलणे अत्यावश्यक आहे याचा तपशील देणाऱ्या ज्या सामंजस्य करारांवर केंद्रीय अर्थ मंत्रालय, नाबार्ड आणि राज्य सरकारांनी स्वाक्षऱ्या केलेल्या आहेत त्यात वेगळेच चित्र दिसते. नवीन कार्यपद्धतीनुसार, सहकारी पतपुरवठा संस्थांच्या एकूण भागभांडवलात राज्य सरकारचा हिस्सा २० टक्क्यांपर्यंत असू शकतो, असे या सामंजस्य करारांवरून स्पष्ट होते. वैद्यनाथन समितीने केलेल्या शिफारशींना अनुसरून विद्यमान सहकार कायद्यात सुधारणा करता येणे समजा शक्य नसल्यास, इच्छुक संस्थांना नोंदणी करणे शक्य व्हावे यासाठी एक नवीनच समांतर सहकार कायदा राज्य सरकारांनी मंजूर करावयाचा आहे. या बाबींची पूर्तता केली गेली तरच आपल्या राज्यातील सहकारी पतपुरवठा संस्थांचे पुनरुज्जीवन घडवून आणण्यासाठी वैद्यनाथन समितीच्या शिफारशींनुसार संबंधित राज्य सरकारला केंद्राकडून निधी मिळू शकेल. सहकारी पतपुरवठा संस्थांचे पुनरुज्जीवन घडवून आणण्यासाठी वैद्यनाथन समितीने सुचविलेल्या शिफारशींचे प्रतिबिंब सामंजस्य करारांमध्ये कितपत पडले आहे, याची कल्पना यावरून यावी !

देशभरातील लहान शेतकऱ्यांपैकी बहुसंख्यांना पतपुरवठा करण्यास सरकारी मालकीच्या बँका तथा खासगी बँकाही अनुत्सुक आहेत. पतपुरवठ्याची सुविधा लहान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी जेवढा खर्च येतो तो खर्च अशा कर्जांवर मिळणाऱ्या व्याजापेक्षा किती तरी अधिक असल्यानेच बँका या संदर्भात हात आखडता घेतात, हे यामागील कारण आहे. परिणामी, बचत गट अथवा मुख्यतः खासगी

लघुवित्त संस्थांच्या माध्यमातूनच ग्रामीण भागांत पतपुरवठा करण्याचा पर्याय व्यापारी बँका आजमितीस अवलंबताना दिसतात. अशा लघुवित्त संस्थांना कायदेशीर दर्जा बहाल करण्याबाबत केंद्र सरकारही उत्सुक आहे.

कृषिक्षेत्राला थेट कर्जपुरवठा करण्यासंदर्भातील सहकारी पतपुरवठा संस्थांच्या क्षमतांवर सरकारचा फारसा विश्वास आता उरलेला दिसत नाही, हेच उपरोक्त अवघ्या विवेचनावरून स्पष्ट व्हावे. वैद्यनाथन समितीच्या शिफारशी पूर्णपणे स्वीकारल्या गेल्या असत्या तर सहकारी पतपुरवठा संस्थांचे पुनरुज्जीवन घडून येण्याबाबत थोडीबहुत तरी आशा होती. परंतु, व्यवहारात तसे घडलेले दिसत नाही. त्यातच आता भर या ताज्या कर्जमाफीची. परिणामस्वरूप, कालांतराने सहकारी पतपुरवठा संस्था या केवळ नावापुरत्याच शिल्लक राहतील. व्यापारी बँकांचा विचार केला तर, कृषिक्षेत्राला थेट कर्जपुरवठा करण्याच्या कामातून सरकारी मालकीच्या व्यापारी बँकांना बाहेर काढून ते काम जिल्हास्तरावरील व्यापारी बँकांकडे सोपविण्याऐवजी खासगी लघुवित्त संस्थांकडे तो कार्यभार सोपविण्याचे हे धोरण दिसते. अशा परिस्थितीत, पतपुरवठा संस्थांवर आगामी भविष्यात या कर्जमाफीचा काय परिणाम होतो ते आता बघावयाचे.

मग उरले ते केवळ बचत गट. आपल्या सदस्यांच्या बचतींचे संकलन करून त्यांद्वारे जमा होणाऱ्या निधीमधून गटातीलच एखाद्या गरजू सदस्याला प्रसंगपरत्वे उद्भवणारी त्याची अडीअडचण -नड भागविण्यासाठी कर्जपुरवठा करण्याचे काम या लहान लहान संस्था-संघटना करीत आल्या आहेत. परंतु, अनेक राज्यांत एक मोठे नवीनच चित्र आता दिसू लागले आहे. आपापल्या बचतीच्या सुमारे चौपटीपर्यंत बचत गटांनी बँकांकडून निधी कर्जाऊ घ्यावा आणि तोच पुढे आपल्या सदस्यांना कर्जरूपाने वितरित करावा, असा प्रस्ताव घेऊन बँकाच बचत गटांकडे आता जात आहेत. किंबहुना, असे करणे हे त्यांच्याच हिताचे कसे आहे, हेही बचत गटांना पटवून देण्याचा उद्योग बँकांनी आता आरंभिलेला आहे. शिवाय, अशा पद्धतीने कामकाज करणाऱ्या बचत गटांना राज्य सरकारकडूनही दर गटामागे ५० हजार रुपयांचे अनुदान मिळेल, अशीही तरतूद आहे. अशा प्रकारच्या पाठपुराव्याचा आणि आग्रहाच्या दडपणाचा माहौल असताना, आपापल्या गटसदस्यांकडून संकलित होणाऱ्या बचतीचे आणि त्या बचतीमधूनच कर्जाच्या रूपाने गटसदस्यांनाच वितरित होणाऱ्या पैशाचे काटेकोर नियोजन, वसुली आणि व्यवस्थापन करण्याबाबत बचत गट आणखी किती दिवस पाय रोवून ठामपणे सक्रिय राहतात ते आता बघावयाचे.

पतपुरवठ्याच्या नेमक्या याच सेवेची उपलब्धता ग्रामीण भागांत करून देण्यासाठी सहकारी पतसंस्थांची निर्मिती करण्यात आली होती. परंतु हळूहळू चित्र असे पालटले की, प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या एकंदर कर्जवाटपात, बाहेरून आलेल्या निधीचे प्रमाणच तीन चतुर्थांश वा त्यापेक्षाही अधिक होऊ लागले. ग्रामीण भागांतील जनसामान्यांच्या परिभाषेत अशा निधीला 'सरकारचा पैसा' असेच संबोधले जाते. वाटप झालेल्या कर्जांवर आकारला जाणारा व्याजाचा दरही, दीर्घ मुदतीच्या ठेवींवर व्यापारी बँकांतर्फे दिल्या जाणाऱ्या व्याजाच्या दरापेक्षा कमीच असे. याचा परिणाम असा झाला की, कर्जदारांना वितरित केलेल्या कर्जांवर त्याचप्रमाणे त्यांच्या परतफेडीवर डोळ्यात तेल घालून देखरेख करण्याची आवश्यकताच सहकारी पतपुरवठा संस्थांच्या सदस्यांना जाणवेनाशी झाली. कारण, कर्जाऊ दिला जाणारा पैसा 'त्यांचा' नव्हताच, तो होता सरकारचा.

या साऱ्याचा परिणाम सहकारी पतपुरवठा संस्थांच्या ठेवी संकलनावरही झाला. सदस्यांना कर्जपुरवठ्याची सेवा अधिक प्रमाणात देता येणे सहकारी पतसंस्थांना शक्य व्हावे, यासाठी सवलतीच्या दराने सरकारी निधीचा पुरवठा सुरू झाल्यावर साहजिकच वाटप कर्जांवर सदस्यांनाही माफक दराने व्याजआकारणी केली जावी, हे ओघानेच आले. अशा माफक वा कमी व्याजदराने कर्जवाटप केल्यानंतर ठेवींवर आकर्षक व्याजदर देणे, हे सहकारी पतसंस्थांना कोठून शक्य व्हावे ? साहजिकच, माफक व्याजदराने सहकारी पतसंस्थेकडून कर्ज पदरात पाडून घ्यावयाचे परंतु आपल्या ठेवी मात्र सरकारी मालकीच्या व्यापारी बँकांमध्ये ठेवावयाच्या असा परिपाठ सरसहा चालू झाला. उद्या बचत गटही याच वाटेने जातील, अशी भीती वाटण्यास यामुळे सबळ आधार आहे. बचत गटांच्या सदस्यांना वाटप करण्यासाठी बँकाच जर घसघशीत निधीपुरवठा करू लागल्या तर, गटाच्या सदस्यांकडून बचत संकलन करणे, संकलित बचतीची निगराणी निगुतीने करणे, बचतनिधीमधूनच गरजू गटसदस्याला कर्जपुरवठा करणे आणि दिलेल्या कर्जाची परतफेड वेळापत्रकाबरहुकूम होते आहे हे बघण्याची काटेकोरपणे दक्षता घेणे या बाबींसंदर्भात बचत गटांमध्येही यथावकाश ढिलाई निर्माण झाली तर त्याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. त्याचप्रमाणे, वाटप कर्जांपैकी बराच मोठा कर्जाऊ निधी हा बाहेरच्या संस्थांकडूनच आलेला असल्याने या कर्जांनाही माफी मिळण्याबाबतची जोरदार मागणी आज ना उद्या पुढे येण्याची बळकट शक्यता नाकारता येत नाही.

ग्रामीण पतपुरवठा संस्थांचे विद्यमान संघटन आणि कामकाजपद्धती बघता, या कर्जमाफीचा या संस्थांवर नजिकच्या भविष्यात होणारा संभाव्य परिणाम म्हणजे, लोकांच्या आणि लोकांनी चालविलेल्या या पतपुरवठा संस्था लयाला जातील. आजमितीस देशभरातील एकूण शेतकऱ्यांपैकी ८५ टक्के शेतकऱ्यांपाशी सरासरी दोन हेक्टरपेक्षा कमीच क्षेत्र आहे. शेतकऱ्यांचा हा वर्ग कसत असलेल्या क्षेत्राचे आकारमान देशात वहितीखाली असलेल्या एकंदर क्षेत्राच्या निम्म्यापेक्षा अंमळ कमी भरते. या शेतकरी वर्गाला शेतीसाठी पतपुरवठा करणे, त्या रकमेच्या विनियोगावर देखरेख ठेवणे आणि त्या कर्जाऊ रकमेची वसुली करणे हे कोणत्याही व्यापारी बँकेस आज कठीणच जाते. यापुढेही ते तसेच कठीण ठरणार आहे. परिणामी, पूर्वीच्या खासगी सावकारांच्या अमलासारखी परिस्थिती आज हळूहळू तयार होते आहे, असे राष्ट्रीय नमुना पाहणी संस्थेने २००२ साली केलेल्या सर्वेक्षणाचे निदान आहे. हीच परिस्थिती आगामी काळात अधिकच सघन आणि बळकट बनेल, अशी भीती वाटावी यास सबळ कारणही आहे. आपल्या बचतीमधून संचित होणाऱ्या निधीला बँकांकडून मर्यादित प्रमाणातच कर्जाऊघेतलेल्या निधीची जोड देत आपल्या स्वतःच्या पतपुरवठा संस्था संघटित करून शेतीसाठी लागणाऱ्या कर्जाचे वाटप, देखरेख आणि वसुलीची व्यवस्था निर्माण करणे हे जर सरासरी दोन हेक्टरपेक्षा कमी क्षेत्राचे धनी असलेल्या या शेतकऱ्यांना जमू शकले तरच त्यांच्या शेतीची वाढ घडून येण्याबरोबरच त्यांच्या कुटुंबांचाही टिकाव आगामी काळात लागण्याचा बऱ्यापैकी संभव दिसतो. आपणच स्थापन केलेल्या संस्था कशा प्रकारे चालवावयाच्या याचे केवळ शिक्षणच त्यांना याद्वारे मिळेल असे नाही तर, त्यांचे सामर्थ्य वाढण्याबरोबरच त्यांच्या आत्मविश्वासातही त्यामुळे वाढ घडून येईल. लोकशाही मूल्ये तसेच संस्थांच्या निर्मितीच्या दिशेने आपल्या देशात फारशी प्रगती घडून न येण्याचे एक कारण श्रेष्ठांडून वा वरिष्ठांकडून मिळणाऱ्या मदतीवरच अवलंबून राहण्याच्या सरंजामशाहीकालीन जुन्या वृत्तीमध्येच दडलेले आहे. स्वतःच्या पायावर उभे राहण्याची क्षमता अंगी येण्यासाठी आपले हित -अहित कशात आहे, हे माणसाला ओळखता यावयास हवे; आपल्या हितसंवर्धनास पूरक ठरेल अशाच प्रकारे शासनाच्या विविध संस्था काम करीत आहेत अथवा नाही, याचा उमग पडावयास हवा. त्यासाठी, प्रथम आपला स्वतःचा अथवा सामूहिकरीत्या केलेला उद्योग-व्यवसाय नीटपणे चालविण्याचा अनुभव मनुष्याला असावयास हवा. लोकसत्ताक राजकीय व्यवस्थेचे गुणवान नागरिक बनण्याचे प्रशिक्षण आम्हांला याद्वारेच मिळू शकेल. अशा प्रकारच्या लोकसंस्था निर्माण

होऊन त्यांचे कामकाज योग्य दिशेने चालू राहील याची दक्षता घेण्यासाठी अनुरूप असे कायदे तयार करण्याऐवजी, सरकार उलट त्यांच्या नाशासच प्रवृत्त होऊन सरंजामशाहीतील युगाप्रमाणे आम्हांला दीनवाणे परावलंबी शरणागत बनवत आहे, ही अतिशय खेदाचीच बाब होय. लोकांना मदत करण्याच्या नावाखाली आम्ही आज हे जे काही करतो आहोत त्यामुळे वास्तवात स्वतःच्या पायावर उभे राहण्याच्या जनसामान्यांच्या क्षमतेवरच कुठराघात होतो आहे, याचे भान आमचे सरकार, राजकीय पक्ष आणि समाजातील बुद्धिवाद्यांना येणे हे अतिशय महत्वाचे आहे.

कर्जाच्या ओझ्याचा भार असह्य झाल्याने आत्महत्या करणाऱ्या गरीब शेतकऱ्यांपेक्षाही तुम्हांला लोकसंस्था अस्तंगत होण्याचीच काय ती अधिक खेदखंत वाटते, अशी एखाद्याची, उपरोक्त सारे विवेचन वाचल्यानंतर, भावना होणे स्वाभाविक ठरते. परंतु, या बाबतची खरी गोष्ट अशी आहे की, विविध राज्यांमध्ये अलीकडील चार -पाच वर्षांमध्ये घडून येत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमागील वास्तव कारणांचा कसोशीने शोध घेणारे संशोधनपूर्ण असे अहवाल वा दस्तऐवजच बघावयास मिळत नाहीत. कर्जबाजारीपणापायी आत्महत्या केलेल्या वैदर्भीय शेतकऱ्यांसंदर्भातील एक शोधक अहवाल भारतीय रिझर्व्ह बँक प्रवर्तित मुंबईच्या 'इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेन्ट रीसर्च' या संस्थेने तयार केलेला आहे. हे संशोधन २००४ सालातील असून, आत्मघातास कवटाळणाऱ्या एकंदर ११६ शेतकऱ्यांच्या कुटुंबांच्या नमुना पाहणीवर ते आधारलेले आहे. आत्महत्यांच्या या ११६ प्रकरणांपैकी प्रत्येक प्रकरणाची व्यक्तिगत तसेच कौटुंबिक माहिती आणि त्या कुटुंबांच्या जमीनधारणेसंबंधीचा तपशील हा अहवाल पुरवितो. या ११६ प्रकरणांचे जे तपशील या अहवालात सादर केलेले आहेत, ते बारकाईने वाचल्यानंतर असे ध्यानात येते की, या ११६ पैकी कमाल ४१ (एकूणांतील ३५ टक्के) तर किमान १७ (एकूणांतील १५ टक्के) प्रकरणे अशी आहेत की जिथे शेतीसाठी कर्जउभारणी केल्यामुळे, पावसाने हुलकावणी दिल्याने दुबार वा तिबार पेरणीची पाळी आल्याने कुटुंबातील व्यक्तीने आत्मघाताचा पर्याय अवलंबल्याचे दिसते. या ४१ तील २४ प्रकरणांमध्ये (म्हणजेच एकूणांतील २० टक्के) शेतीसाठीच कर्ज घेतल्याचे, पावसाने दगा दिल्याने दुबार वा तिबार पेरणी करण्याची वेळ ओढवल्याचे दिसून येत असले तरी त्या बरोबरच, संबंधित व्यक्ती ही व्यसनाधीन असल्याचे तसेच मुलीच्या लग्नासाठी वा कुटुंबातील आजारपणासाठीही मोठ्या प्रमाणावर कर्जउभारणी केली गेल्याचे दिसते. उर्वरित दोन तृतीयांश प्रकरणांमध्येही

(म्हणजेच एकूणांतील जवळपास ६५ टक्के) आत्महत्येचा मार्ग स्वीकारणाऱ्या व्यक्तीच्या माथ्यावर कर्जाचे ओझे असले तरी त्या कर्जाचा संबंध त्यांच्या शेतीशीच असल्याचे दिसत -जाणवत नाही. आत्मघाताच्या वाटेने गेलेल्यांपैकी काही जण हे व्यसनासक्त होते आणि कर्जाऊरकमेचा वापर त्यांनी व्यसनपूर्तीसाठी केल्याचे दिसते. तर. घरातील लग्नकार्यासाठी काहींनी आपल्या मगदुरापेक्षा अधिक रकमा उधार घेतल्याने त्या कर्जाची परतफेड न करता आल्यामुळे त्यांनी मृत्युला कवटाळले असावे. नमुना पाहणीतील एकंदर १० टक्के प्रकरणांमध्ये आत्मघात केलेल्या व्यक्तींचे मानसिक संतुलन ढळलेले असल्याने वा त्यांचे मानसिक आरोग्य ठीक नसल्यामुळे त्या तणावाखाली त्यांनी आत्महत्या केली असणे संभाव्य असल्याचे दिसते. अनेक प्रकरणांमध्ये कौटुंबिक वा कोणत्या तरी अज्ञात कारणांसाठी संबंधित व्यक्तीने आत्मघाताचा पर्याय अवलंबल्याचे दिसते. या प्रत्येक प्रकरणामध्ये कर्जाचा बोजा संबंधितांच्या माथ्यावर असल्याचे दिसते, परंतु, त्या कर्जांचा संबंध त्यांच्या शेतीच्या अनवस्थेशी असावा असे सुचविणारे कोणतेही तपशील मात्र आढळत नाहीत.

घरातील लग्नकार्याकरिता असो वा अन्य कोणत्याही कौटुंबिक कारणासाठी घेतलेले कर्ज असो, त्या कर्जाची परतफेड करता न आल्याने संबंधित व्यक्तीने केलेली आत्महत्या ही कर्जबाजारीपणापायीच झालेली आत्महत्या ठरते, यात वाद नाही. परंतु, अशी कर्जे आज माफ झालेली असल्याने वा उद्याही ती जरी अशीच माफ झाली तरी अशी कर्जमाफी हा मूळ समस्येवरील उतारा ठरू शकत नाही. ही आता केवळ आर्थिकच नव्हे तर अतिशय गंभीर अशी सामाजिक समस्या बनली आहे. या अशा सामाजिक समस्येवरील उपाययोजना ही सामाजिक अथवा फार फार तर ज्ञातिसमूहांच्या पातळीवरच केली जाऊ शकते. विविध ज्ञातींमध्ये होणाऱ्या सामूहिक विवाहांबद्दल आपण सारेच अलीकडे वाचत असतो. या समस्येवरील हा एक उतारा ठरू शकतो. कौटुंबिक कारणांसाठी घेतलेल्या कर्जांची परतफेड करता न आल्याने संबंधितांनी आत्मघात करणे, हेही तसे अपूर्व म्हणता येणार नाही. परंतु, पुन्हा, कर्जमाफी हे त्यावरील उत्तर ठरत नाही. प्रतिकूल हवामान, हिणकस दर्जाची बी-बियाणे अथवा शेतमालाचे बाजारभाव घसरल्याने अडचणीत येणाऱ्या शेतकऱ्यांना मदत ही केलीच पाहिजे. वाईट हवामानाचा फटका बसलेल्या ज्या शेतकऱ्यांना शेतीकर्ज विम्याचे आच्छादक संरक्षण उपलब्ध नाही अशा शेतकऱ्यांनी दुबार वा तिबार पेरणीसाठी घेतलेल्या कर्जांना माफी जाहीर करून तसेच त्यांच्या मूळच्या

कर्जावरील व्याज माफ करून सहारा द्यायलाच हवा. तसेच, वर्षानुवर्षे नापिकीचा मुकाबला करणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या मूळच्या कर्जाच्या परतफेडीतूनही मुक्त केले जावे. भारतीय रिझर्व्ह बँक, नाबार्ड आणि सरकार यांनी यासाठी संयुक्तरीत्या अनुरूप अशी संस्थात्मक रचनाही तयार करावी. नानाविध प्रकारच्या शेतमालासाठी सरकार किमान आधारभूत किंमती जाहीर करत असते. परंतु, जाहीर करण्यात आलेल्या आधारभूत किंमतींना त्या त्या शेतमालाची खरेदी शेतकऱ्यांकडून करण्यासाठी आवश्यक असणारी संस्थात्मक व्यवस्था व्यवहारात सिद्ध नसल्याचाच अनुभव बरेचदा येतो. अशी संस्थात्मक रचना पुरविली जाणे अगत्याचे आहे. बनावट आणि पेरणीसाठी अयोग्य अशा बी-बियाणांची तसेच त्यांच्या जोडीनेच येणाऱ्या कीटकनाशकांची अनेक भागांत केली जाणारी विक्री रोखली जाणेही आवश्यक आहे. अशा बनावट बी-बियाणांच्या वापराबाबत शेतकऱ्यांना सावध करण्यासाठी तसेच त्यांच्या वापरापासून त्यांना परावृत्त करण्यासाठी राज्य सरकारच्या विस्तार यंत्रणेतील अधिकाऱ्यांनी खेडोपाडी माहिती अभियान हाती घेण्याची गरज आहे. त्याच वेळी, अशा बनावट बी-बियाणांची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर खटले दाखल करून त्यांची रवानगी तुरुंगात करण्यासाठीही समांतर पावले उचलली जाण्याची निकड आहे. केवळ कर्जमाफी जाहीर केल्याने या साऱ्या बाबींची पूर्तता होणे कसे शक्य आहे ? शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसारख्या दुःखद घटना रोखण्यासाठी अनेक प्रकारे प्रयत्न करावे लागतील वा करता येतील. शेतकऱ्यांची सारी कर्जे एका दमात माफ करून टाकणे हाच एक त्यावरील रामबाण उपाय आहे, असे समजणे चुकीचे ठरेल. कर्जे माफ केल्याने आत्महत्यांना पायबंद बसेल याची हमी नाहीच, उलट, त्यामुळे सहकारी पतपुरवठा संस्था तसेच बचत गटांसारख्या लोकसंस्थांचे क्रमाने मरण ओढवण्यातच त्याची परिणती होईल. त्याचा परिणाम होईल तो एवढाच की सारे मैदान हे खेडोपाडीचे सावकार आणि संस्थात्मक क्षेत्रातील त्यांची जणू भावकीच शोभणाऱ्या लघुवित्त संस्थांना मोकळे मिळेल.

शेतकऱ्यांना आज करण्यात आलेल्या घसघशीत कर्जमाफीमुळे अनेक शेतकऱ्यांना दिलासा मिळेल हे खरे. परंतु, या कृतीचे जे दीर्घकालीन परिणाम संभवतात त्यांचा विचारही कोणास शिवत असल्याचे दिसत नाही. सरकार, राजकीय पक्ष आणि सर्वसामान्यांचे लक्ष या वास्तवाकडे वळावे, याचसाठी प्रस्तुत लेखाचा हा सारा खटाटोप. *(प्रस्तुत लेख 'साधना' साप्ताहिकाच्या ३१ मे २००८ च्या अंकात प्रसिद्ध झाला आहे. 'अर्थबोधपत्रिके'च्या वाचकांसाठी तो इथे पुन्हा दिला आहे).* ✿✿

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

■ **Bound Together : How Traders, Preachers, Adventurers, And Warriors Shaped Globalization : By Nayan Chanda, Penguin Viking, New Delhi 110 017, 2007, pp. XVI + 391, Price- Rs. 525/-**

काहीजणांकडून भरगच्च हार तर काहींकडून केले जाणारे कठोर प्रहार, कोणाचा जोरदार पाठिंबा तर कोणाचा तितकाच प्रखर विरोध, एकीकडे अमर्याद आकर्षण तर दुसरीकडे पराकोटीचा दुस्वास, एका कोपऱ्यात लाल पायघड्या घालून स्वागत तर, त्याच जगाच्या दुसऱ्या एखाद्या कोपऱ्यात हिंसक धिक्कार... इतक्या टोकाच्या आणि परस्परांशी विसंगत भावभावनांचे धनीपण या जगात आजमितीस कोणाच्या वाट्याला आले आहे, असा प्रश्न जर कोणी विचारलाच तर 'जागतिकीकरण' या संकल्पनेव्यतिरिक्त अन्य कोणताही दुसरा पर्याय आपल्यापैकी बहुसंख्यांच्या मनाला शिवणारदेखील नाही. 'जागतिकीकरण' म्हणजे नववसाहतवादाचा मागील दाराने होत असलेला प्रवेश आहे इथपासून ते, अमेरिकेसह एकंदरच विकसित देशांच्या आजच्या स्वार्थी आणि आक्रमक अर्थकारणाची ती परिणती आहे, इथपर्यंतची मते या संदर्भात आजवर हिरीरीने मांडली गेली आहेत. परंतु, भवतालच्या परिस्थितीशी संवाद साधणे, परिसराशी नाते जोडणे, आजूबाजूच्या जीवसृष्टीशी अनुबंध प्रस्थापित करणे या मूलभूत मानवी प्रेरणांचेच अधिष्ठान जागतिकीकरणाच्या मुळाशी आहे, इतके निर्लेप आणि विलक्षण रोचक विवरण समृद्ध अशा इतिहासदत्त पुराव्यानिशी करत जागतिकीकरणाप्रतीच्या आपल्या आकलनाला एक ऐतिहासिक परिमाण प्राप्त करून देणारा दस्तऐवज म्हणून नयन चंदा यांच्या उपरोक्त ग्रंथाचे महत्व विशेष वाटते. तसेच, जागतिकीकरण हे आजचे म्हणजे २० व्या अथवा २१ व्या शतकाचे अपत्य आहे असे समजण्याचे कारण नाही तर, दूरदूरच्या बाजारपेठांचा वेध प्राचीन काळापासून घेणारे व्यापारी, धर्मोपदेशक, नवनवीन भूभाग पादाक्रांत करण्याची विजिगीषु वृत्ती बाळगणारे लढवय्ये आणि साहसी सफरवीर हे जागतिकीकरणाचे आद्य प्रेरक आहेत, हे वास्तव लेखकाने अतिशय नजाकतीने इथे सादर केले आहे. तसेच, या सगळ्या घडामोडींच्या मुळाशी असलेल्या आर्थिक तसेच तंत्रज्ञानात्मक घटकांचा त्याने घेतलेला वेधही वाचनीयच आहे. ■■

RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: L-2/RNP/PNW/M 125/2007-2009
Licensed to Post Without Prepayment, LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•अजित कर्णिक •विकास चित्रे •अभय टिळक •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी
•सुहास पळशीकर •रमेश पानसे •मनोहर भिडे •योगेंद्र यादव •नीळकंठ रथ
•व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**